# मेहता मराठी ग्रंथजगत

एप्रिल, २०२५


पृष्ठे ६८ किंमत : रु.१५

वर्ष पंचविसावे

अंक चौथा








"प्रवाहाच्या विरुद्ध दिशेला
तेच पोहू शकतात
ज्यांचे निर्धार ठाम असतात,
ज्यांना कुठलेतरी ध्येय
गाठायचे असते.

## महात्मा जोतीराव फुले

जयंती : ११ एप्रिल, १८२७

स्मृतिदिन : २८ नोव्हेंबर, १८९०

# साहित्य पुरस्कारासाठी आवाहन



## 'प्रकाशक सुनील मेहता साहित्य सृजन पुरस्कार'



'मेहता पब्लिशिंग हाऊस'चे संचालक श्री. सुनील मेहता यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ सन २०२४ पासून **'प्रकाशक सुनील मेहता साहित्य सृजन पुरस्कार'** देण्यास सुरुवात झाली. या पुरस्काराची घोषणा १० जानेवारी, २०२३ रोजी डॉ. किरण बेदी यांच्या उपस्थितीत करण्यात आली होती.

या पुरस्काराचे स्वरूप खालीलप्रमाणे असून साहित्य क्षेत्रात प्रथम प्रकाशनास प्रोत्साहनपर हा पुरस्कार दिला जाणार आहे.

**सर्वोत्कृष्ट कादंबरी**
₹ ३०,०००/-

**सर्वोत्कृष्ट कथासंग्रह**
₹ २०,०००/-

### पुरस्कारासाठी अर्ज करण्यासंदर्भात प्राथमिक नियम व अटी :

१ ऑक्टोबर, २०२४ ते ३० सप्टेंबर, २०२५ दरम्यान प्रकाशित झालेली लेखकाची पहिली कादंबरी किंवा कथासंग्रह या पुरस्कारासाठी ग्राह्य धरली जाईल.

अर्ज स्वीकृतीची अंतिम तारीख : १ नोव्हेंबर, २०२५ पर्यंत

पात्र इच्छुकांनी पुस्तकाची एक प्रत, संपूर्ण परिचय, संपूर्ण माहिती (नाव, पत्ता, संपर्क क्रमांक) आणि फोटो आमच्या पत्त्यावर पाठवावे.

या पुरस्काराची घोषणा डिसेंबर, २०२५ मध्ये केली जाईल.
१२ जानेवारी, २०२६ रोजी श्री. सुनील मेहता यांच्या स्मृतिदिनी पुरस्काराचे वितरण केले जाणार आहे.

# मेहता मराठी ग्रंथजगत

◆ एप्रिल २०२५ ◆ वर्ष पंचविसावे ◆ अंक चौथा

**संपादक**
अखिल मेहता

**संस्थापक संपादक**
शंकर सारडा

**संपादन साहाय्य**
प्रतीक येतावडेकर

**अंकाची किंमत १५ रु.**
वर्गणी मनीऑर्डरने अथवा ऑनलाइन पाठवावी.

**प्रसिद्धी :**
दरमहा ११ तारखेस

**मांडणी-अक्षरजुळणी**

*मेहता पब्लिशिंग हाऊस*


– *अनुक्रमणिका* –


| | |
|---|---|
| **संपादकीय** | **४** |
| **पुरस्कार** | **१०** |
| **प्रकाशन** | **११** |
| **पुस्तकाच्या पानांतून** | |
| दि प्रिन्सेस | १२ |
| बत्ताशी | २४ |
| म्हाई | ३४ |
| एका अपरिचित गांधींची आत्मकथा | ४४ |
| द गोल्डन एज | ५२ |
| **दिनविशेष** | **६२** |



संपादक-मुद्रक-प्रकाशक : अखिल मेहता,
१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड, टेलिफोन भवनसमोर, पुणे ४११ ०३०
फोन : ०२०-२४४७६९२४/२४४७५४६२ I E-mail : mmgj@mehtapublishinghouse.com



'मेहता मराठी ग्रंथजगत' हे मासिक मालक, मुद्रक व प्रकाशक अखिल सुनील मेहता यांनी जय गणेश ऑफसेट, २०/१डी/१अ, सोमवार पेठ, महाराजा लॉज मागे, पुणे- ४११०११ येथे छापून, १९४१ सदाशिव पेठ, पुणे - ४११०३० येथे प्रसिद्ध केले. संपादक - अखिल सुनील मेहता.

'Mehta Marathi Granth Jagat' monthly is owned, Printed & Published by Akhil Sunil Mehta, Printed at Jai Ganesh Offset, 20/1D/1A, Somvar Peth, Behind Maharaja Lodge, Pune – 411 011 & Published at 1941, Sadashiv Peth, Pune – 411 030. Editor – Akhil Sunil Mehta.

# संपादकीय

## द्रष्टे समाजसुधारक महात्मा फुले

महाराष्ट्राला प्रबोधनाची परंपरा आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात अनेक समाजसुधारकांनी प्रबोधनाच्या माध्यमातून जनजागृती केली. समाजात राहत असताना वर्षानुवर्षे, पिढ्यान्‌पिढ्या चालत आलेली एक व्यवस्था असते. त्या व्यवस्थेच्या चौकटीत राहून माणूस दैनंदिन व्यवहार पार पाडत असतो. इंग्रज काळात पश्चिम बंगाल व महाराष्ट्र या दोन राज्यांत प्रामुख्याने समाजसुधारक होऊन गेले हे आपल्या सहज ध्यानात येते. राजाराम मोहन राय यांनी सतीप्रथेच्या विरोधात आवाज उठवून, ती अनिष्ट प्रथा बंद करण्यास जनमानसास भाग पाडले. त्याच प्रकारे महाराष्ट्रातही महात्मा फुले यांनी स्त्रीशिक्षणाचा पुरस्कार करून त्यासंबंधी काम केलेले आपल्याला माहीत आहेच. महाराष्ट्राच्या सामाजिक इतिहासात महात्मा जोतिराव फुले यांचं नाव अग्रक्रमाने घ्यावे लागते.

सामाजिक सुधारणांसाठीचा आग्रह, त्यासाठी लोकांमध्ये करावी लागणारी जागृती यासाठी फुले यांची लेखणी कायमच सज्ज असे. सार्वजनिक सत्य धर्माचा आग्रह धरणारा द्रष्टा सुधारक म्हणून महात्मा फुले यांचे

नाव आपण अभिमानाने घेत असतो. शिवाजी महाराजांचा पोवाडा लिहून बहुजनांचा उद्धारक हा शिवाजीराजा होता याची ओळख आपल्या लिखाणातून त्यांनी करून दिली. 'कूळवाडीभूषण' ही बिरुदावली लावून जनसामान्यांचा, रयतेचा राजा म्हणून शिवरायांनी केलेले कार्य जनमानसावर बिंबवले.

महाराष्ट्राला पुरोगामी विचारांची परंपरा आहे. ही परंपरा मध्ययुगीन काळापासून ते आजतागायत अविरतपणे सुरू आहे. या पुरोगामी परंपरेचे पहिले पाईक हे संत होत. विविध जाती-जमातींमधील संतांनी या प्रबोधन विचारांचा पाया घातला. त्याच विचारांचा पुरस्कार करणारे आद्य सुधारक म्हणून महात्मा फुले यांच्याकडे पाहिले जाते. रायगडावर असणारी छ. शिवाजी महाराजांची समाधी उजेडात आणण्याचे महत्त्वाचे काम महात्मा फुले यांनी केले. शिवसमाधीचा शोध फुले यांनी लावला. 'शेतकऱ्याचा असूड' या त्यांच्या पुस्तकातून शेतकरी वर्गाचं शोषण, त्यांची होणारी पिळवणूक व त्यांच्यावर केले जाणारे अत्याचार यांना त्यांनी वाचा फोडली.

पहिल्या ग्रंथकार संमेलनास आमंत्रित केलेले असताना देखील महात्मा फुले त्या संमेलनास गेले नाहीत. मात्र त्या संमेलनाचे अध्यक्ष असणाऱ्या न्या. रानडे यांना महात्मा फुले यांनी लिहिलेले पत्र आजही प्रसिद्ध आहे. तितकेच ते नेमक्या बाबींवर बोट ठेवून भाष्य करणारे देखील आहे. काळाच्या पुढे जाऊन विचार करणारा द्रष्टा समाजसुधारक म्हणून फुले आपल्याला वेगवेगळ्या भूमिका घेऊन त्याबाबत आग्रही असलेले दिसून येतात. स्त्रीशिक्षणाची सुरुवात करणारा, त्यासाठी अभिजनांचा विरोध पत्करून स्त्रीशिक्षण देणारा हाडाचा शिक्षक एक वेगळाच पैलू घेऊन शिक्षणासाठी कार्य करताना पाहायला मिळतो. शिक्षणासंबंधीचे विचार व्यक्त करताना महात्मा फुले म्हणतात, 'विद्येविना मती गेली, मतिविना नीती गेली, नीतिविना गती गेली, गतिविना वित्त गेले, वित्ताविना शूद्र खचले, इतके अनर्थ एका अविद्येने केले.' बहुजनांबद्दल कणव असणारा, त्यांच्यासाठी झटणारा सुधारक म्हणून महात्मा फुले आपल्याला एका मोठ्या पहाडाप्रमाणे

भासतात. महात्मा फुले यांची या महिन्यातील ११ तारखेला १९८वी जयंती. या प्रबोधन युगाच्या अध्वर्यूस जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन!

मेहता पब्लिशिंग हाऊस ही प्रकाशन संस्था स्थापनेपासूनच नवनवे प्रयोग राबवणारी संस्था म्हणून सर्वश्रुत आहे. अनुवादासंदर्भात आजवर केलेल्या कामाची पोचपावती म्हणून 'द डिफिकल्टी ऑफ बीईंग गुड' या गुरचरणदास लिखित व सुदर्शन आठवले अनुवादित पुस्तकाला साहित्य अकादमी अनुवाद पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. सन २०२४ वर्षासाठीचा हा पुरस्कार अलीकडेच जाहीर करण्यात आला, पुरस्कार मिळाल्याने मेहता पब्लिशिंग हाऊसच्या अनुवादासंदर्भातल्या कार्याची दखल राष्ट्रीय स्तरावर घेण्यात आली याचा आम्हाला सार्थ अभिमान आहे. पुस्तकाचे लेखक गुरचरणदास व अनुवादक सुदर्शन आठवले यांचे मन:पूर्वक अभिनंदन!

अखिल
मेहता

## नवी संहिता... नवा आशय...








**भा. द. खेर**

बदलत्या काळाप्रमाणे सामाजिक - वैचारिक विचारांचा मेळ साधताना साहाय्य होते महापुरुषांच्या महायात्रेतून मिळालेल्या समाजहिताच्या ज्ञानाचे

**किंमत : ३४०/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध**




**चेतन जोशी**

अनुवाद

**मंजिरी धामणकर**

मध्ययुगीन काल्पनिक गाथा, पारंपरिक भयकथा ते खोडकर नीतीविषयक दंतकथा अशा विविध आस्वादांचा मिलाफ असणारा कथासंग्रह

**किंमत : ४९९/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

मेहता मराठी
ग्रंथजगत

नवनवीन पुस्तकांच्या अद्ययावत माहितीसाठी
आजच वर्गणीदार व्हा.

आमच्या छापील अंकाची वर्गणी

**त्रैवार्षिक वर्गणी ४५० रुपये**
**पंचवार्षिक वर्गणी ६०० रुपये**

डिजिटल अंकाची वर्गणी

**त्रैवार्षिक वर्गणी ३०० रुपये**
**पंचवार्षिक वर्गणी ४०० रुपये**

***Available on***

amazonkindle | Google Play Books

Find us on:
facebook®

https://www.facebook.com/mehtapublishinghouse

# मेहता पब्लिशिंग हाऊस

BOOK CLUB
या क्लबचे सभासद व्हा. आणि उत्तमोत्तम अनुवादित पुस्तके निम्म्या किमतीत मिळवा!

## टी बुक क्लब

आजच व्हा सदस्य, निम्म्या किंमतीत मिळवा पुस्तकं

* ₹ ५० भरून 'टी बुक क्लब'चे सदस्यत्व.
* दरवर्षी सहा लोकप्रिय पुस्तकांचे अनुवाद निम्म्या किंमतीत
* योजनेतील सहाही पुस्तके घेणे बंधनकारक


**टी बुक क्लब योजनेतील 'क्लासिक्स'साठी खास सवलत!**

₹ १०० भरून 'टी बुक क्लब' यादीतील कोणतीही ८ किंवा सर्व पुस्तके एकाचवेळी निम्म्या किंमतीत मिळवा. पोस्टेज खर्च अतिरिक्त.

फोन : (०२०) २४४७६९२४ ९४२०५९४६६५

सदस्यत्वासाठी ऑनलाइन लिंक -

www.mehtapublishinghouse.com/memberships.aspx





नाहीत स्कॅन केलेली पाने
किंवा नाहीत पीडीएफ्स...
मराठीत प्रथमच,
खरीखुरी **eBooks**
युजर फ्रेंडली, वाचायला सोपी, सोयीस्कर –
थेट तुमच्या कॉम्प्युटर, आयपॅड,
किंडल आणि ॲन्ड्रॉइड टॅब्लेटवर!

ebook available on :

amazonkindle | Get it on Apple Books | Google Play Books

# पुरस्कार

## साहित्य अकादमी पुरस्कार



साहित्य अकादमीतर्फे देण्यात येणारा 'अनुवाद पुरस्कार' २०२४साली मराठी भाषेतील ज्येष्ठ अनुवादक सुदर्शन आठवले यांना, त्यांनी अनुवादित केलेल्या आणि मेहता पब्लिशिंग हाऊसने प्रकाशित केलेल्या गुरुचरण दास यांच्या 'The Difficulty of Being Good' या पुस्तकासाठी जाहीर झाला आहे.

मेहता पब्लिशिंग हाऊसतर्फे सुदर्शन आठवले यांचं मन:पूर्वक अभिनंदन!

## ज्ञानपीठ पुरस्कार

भारतातील सर्वांत प्रतिष्ठित पुरस्कारांपैकी महत्त्वाचा मानला जाणारा ज्ञानपीठ पुरस्कार या वर्षी हिंदी साहित्यातील अजरामर लेखक विनोद कुमार शुक्ल यांना जाहीर झाला आहे. हे छत्तीसगढमधील पहिले ज्ञानपीठ पुरस्कारप्राप्त हिंदी साहित्यिक आहेत.

मेहता पब्लिशिंग हाऊसतर्फे विनोद कुमार शुक्ल यांचं मन:पूर्वक अभिनंदन!

◆

## सु. ल. खुटवड यांच्या 'निवडक पंचनामा'मधील पाच पुस्तकांचे प्रकाशन


पुणे : मेहता पब्लिशिंग हाऊसच्या वतीने दै. सकाळचे वरिष्ठ उपसंपादक सु. ल. खुटवड यांच्या 'निवडक पंचनामा' मधील पाच पुस्तकांचे प्रकाशन २८ मार्चला करण्यात आले. मेहता पब्लिशिंग हाऊसचे व्यवस्थापकीय संचालक अखिल मेहता, ज्येष्ठ लेखिका मंगला गोडबोले आणि महाराष्ट्र साहित्य परिषदेचे कार्यवाह मिलिंद जोशी यांच्या उपस्थितीत हा प्रकाशन सोहळा पार पडला. विनोदी साहित्य लिहिणाऱ्या मराठी लेखकांनी विनोदी कादंबरी लिहावी, असे आवाहन या वेळी गोडबोले यांनी केले, तर सध्या मराठीतील विनोदी लेखनाची स्थिती गंभीर असल्याची खंत जोशी यांनी व्यक्त केली. पुण्यातील स.प. महाविद्यालयाच्या लेडी रमाबाई हॉलमध्ये हा कार्यक्रम पार पडला. सु. ल. खुटवड यांनी प्रास्ताविक केले आणि डॉ. गीता मांढरे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. प्रतीक येतावडेकर यांनी आभार मानले.

◆



२५

## पुस्तकाच्या पानांतून




# दि प्रिन्सेस

**मनोहर माळगांवकर** अनुवाद : **भा. द. खेर**

*स्वातंत्र्याची पहाट उगवत असताना ढासळत गेलेला संस्थानिकांचा वर्षानुवर्षांचा रुबाब आणि नव्या जडणघडणीची अनोखी कहाणी*

### यावच्चंद्रदिवाकरौ

नकाशावर फक्त दोनच रंग होते. एक लाल आणि दुसरा पिवळा. लाल ब्रिटिश राज्यकर्त्यांचा आणि पिवळा आम्हा

राजेरजवाड्यांचा! गेल्या शंभर वर्षांवर हे दोनच रंग त्या नकाशावर अव्याहतपणानं नांदत होते; पण ब्रिटिश राज्यकर्ते निघून गेले आणि अगदी अल्पावधीत लाल रंगाबरोबरच पिवळाही रंग पार पुसला गेला. मग त्या दोन रंगांतून निर्माण झालेला नारिंगी हा एकच एक रंग नकाशावर दिसू लागला. देशाच्या नकाशावर पिवळ्या रंगाचा बारीक ठिपका- देखील उरला नाही.

होय, आम्ही एके काळी संस्थानिक होतो. आमचाच रंग नकाशावरून पार पुसला गेला. त्याचं कुणालाच सोयरसुतक वाटलं नाही; कारण आम्ही एक थट्टेचाच विषय बनलो होतो म्हणाना! ब्रिटिशांच्या छायेत आम्ही वावरत होतो तोवर सारं ठीक होतं. नाहीतर मागेच आमचा अवतार संपला असता. ब्रिटिशांचं कृपाछत्र अकस्मात गळून पडलं आणि आम्ही पोरके बनलो. खडकाखाली सुखावलेल्या बेडकासारखी आमची अवस्था होती; तो खडक निखळला आणि आम्ही तळपत्या उन्हात तडफडू लागलो. आमचा अवतार संपावा अशीच परिस्थिती निर्माण झाली. आमच्या देवाचं ते दुर्विलसित अटळ होऊन बसलं. खरं म्हणजे यापेक्षा दुसरं काय घडणं शक्य होतं? त्या हरपलेल्या वैभवाचं दुःख मात्र मला आजही मनावेगळं करता येत नाही. ज्या अतीव वेगानं साऱ्या घटना घडल्या त्याचं आश्चर्यही वाटल्यावाचून राहत नाही. काल आम्ही सत्ताधीश, संस्थानिक होतो आणि आज भर उन्हात तडफडणाऱ्या बेडकांप्रमाणे आमची अवस्था होऊन गेली. ब्रिटिशांच्या सत्ताछायेत आम्ही वावरत होतो तेव्हाचे दिवस मला आठवतात. ते रेशमी मंदिल, ते शोभिवंत तुरे, ते किनकाफी झगे, ते मखमलीचे चढाव आणि ते सारं झगमगीत राजवैभव! मला ते सारं स्मरतं आणि ज्या द्रुत गतीनं ते सारं वैभव नाहीसं झालं, तेही अगदी स्पष्ट डोळ्यांपुढे दिसत राहतं!

आमच्यापुरतं म्हणाल तर आम्ही असंच धरून चाललो होतो की, कोणतीही शक्ती आमचा कायापालट करू शकणार नाही. यावच्चंद्रदिवाकरौ आम्ही आहोत असेच राहणार आहोत; कारण ब्रिटिश राजमुकुटाच्या वतीने आम्हाला साक्षात शब्द मिळाला होता. आमची सार्वभौम सत्ता अबाधित राहील अशी अभिवचनं आम्हाला राणीच्या जाहीरनाम्यानंच मिळाली होती. फार लोक १९३८ सालच्या उन्हाळ्यातील एक गोष्ट. माझे वृद्ध पिताजी एखादा मंत्र म्हणावा त्याप्रमाणे एकच विचार सारखा घोकत होते ...

''माझे हे बेगवाडचं राज्य यावच्चंद्रदिवाकरौ नांदणार आहे, माझ्या बेडर

घराण्याकडेच ते वंशपरंपरागत राहणार आहे.''

मला तो प्रसंग चांगला आठवतो; कारण त्याचवेळी माझ्या पिताजींशी माझा तो खटका उडाला. ते इतके संतापले की, त्यांनी मला समोर उभंदेखील राहू दिलं नाही.

संध्याकाळची वेळ होती आणि दरबार आटोपून पिताजी नुकतेच परत आले होते. आपल्या बैठकीच्या दिवाणखान्यात एका लोडाला टेकून ते बसले होते. साऱ्या दिवाणखान्यात व्याघ्राजिनाची बैठक अंथरली होती. अठ्ठावन्न वाघांची कातडी एकत्र बांधून ती लांब-रुंद बैठक तयार करण्यात आली होती. एवढ्या वाघांची शिकार एकट्या पिताजींनीच केलेली होती. बैठकीवर त्यांचं संथचित्त मदिरापान चाललं होतं.

एवढ्यात कॅप्टन हैबतराम आत आला आणि त्यानं दिवे शिलगावले. पिताजी एकदम उठून उभे राहिले आणि दिव्यांच्या झुंबराकडे बघून त्यांनी आदरपूर्वक नमस्कार केला, मीही पिताजींना लवून मुजरा केला. हैबतरामानंही तेच केलं. दिवाणखान्यांत मंद प्रकाश पडलेला होता. झुंबरांतील काही दिवे जागेवर नव्हते आणि भिंतीवरील दिवे अद्याप लागलेले नव्हते. पिताजी पुन्हा लोडाला टेकून बसले. आळीपाळीने त्यांचं धूम्रपान आणि मदिरापान सुरू झालं, ते हुक्का ओढीत होते आणि पाठोपाठ व्हिस्कीचा पेला तोंडाला लावत होते. त्यांनी हैबतरामाला 'तू जाऊ शकतोस' अशी खूण केली आणि आमची चर्चा पुन्हा सुरू झाली. संस्थानाला नवीन राज्यघटना लागू होणार होती; आणि त्या राज्यघटनेवरच आमचा खल चालला होता.

त्यावेळी मी कॉलेजच्या शेवटच्या वर्षांत होतो. मला अठरावं वर्ष लागलं असेल-नसेल; पण माझ्या डोक्यात कित्येक विषयांची गर्दी होत होती. अर्थात एकाही विषयाचं मला तसं पुरतं ज्ञान झालं असेल तर शपथ! संस्थानाला नव्यानंच लागू होणाऱ्या राज्यघटनेबद्दल मी पिताजींशी चर्चा करीत होतो. मला त्याही विषयाचं फारसं ज्ञान नव्हतं; पण विरुद्ध बाजू घेऊन मी पिताजींशी चर्चा करीत होतो. ते मला साऱ्या गोष्टी समजावून सांगत होते; पण माझा विरोध संपत नव्हता. त्यातच मला एक प्रकारचा खोडसाळ आनंद वाटत होता.

मी त्यांना म्हणालो, ''दादा, तुम्ही तुमच्या सल्लागार मंडळात नुस्ती वाढ केली आहे एवढंच! पूर्वी तीन सल्लागार होते. आता ती संख्या तुम्ही

सहावर नेली!’’

यावर दादा म्हणाले, ‘‘पण त्यातील एक सल्लागार लोकनियुक्त आहे.’’

‘‘तेही फारसं खरं म्हणता येणार नाही, इतर पाच सदस्यांनी नावं सुचवायची आणि त्यातून तुम्ही एकाची निवड करायची एवढीच तुमच्या या नव्या घटनेत तरतूद आहे.’’

‘‘कसं बोललास! इतर सदस्यांनी सुचविलेल्या नावातून आम्ही ती निवड करणार! ती निवड मी एकटा थोडीच करणार आहे?’’

त्यांचं हे तर्कशास्त्र मला मोठं अजब वाटलं. मी म्हणालो, ‘‘त्या सल्लागारांना तुमच्या खासगीत तोंडही घालण्याची अखत्यारी नाही. फार तर तुमच्या खासगीच्या रकमेत त्यांना वाढ करता येईल; पण कपातीची बातच पुसू नका; आणि त्यांनी ठरविलेली जी गोष्ट तुम्हाला भावणार नाही ती प्रत्येक गोष्ट तुम्ही नाकारू शकाल!’’

‘‘अर्थातच! आम्हा राजेलोकांचा तो ‘व्हीटो’चा अधिकारच आहे!’’

दिवाणखान्यात आम्ही दोघं बोलत बसलो होतो. दिवाणखाना व्याघ्राजिनांनी व्यापला होता. समोरच्या भिंतीलगत पांढराशुभ्र गालिचा अंथरला होता. एका खास लोडावर फिकट निळसर रंगाचा तलम अभ्रा चढविला होता. त्या लोडाला टेकून दादा बसले होते आणि मी त्यांच्यासमोर बसलो होतो. रंगमंचावर एखाद्या नाटकातील भूमिका आम्ही वठवीत आहोत, असा भास होत होता.

राजवाड्याच्या टॉवरवरील घड्याळाने एक ठोका दिला. संध्याकाळचे साडेसात वाजले होते आणि एखादं नाटक सुरू करण्याचाच तो जणू इशारा आहे असं वाटावं म्हणूनच की काय, दोन सेवक लगबगीनं तिथे आले आणि चांदीच्या धूपदाणीतून त्यांनी धूप जाळला. त्या सेवकाचं आमच्याकडे लक्षही नव्हतं. साऱ्या दिवाणखान्यात विशिष्ट प्रकारचा सुवास दरवळला. ते सेवक बाहेर जाईपर्यंत मी बोलायचा थांबलो. दादांचं हुक्कापान सुरूच होतं. गुड्गुड् असा आवाज तेवढा ऐकू येत होता. भिंतीवर टांगलेल्या ढाल-तलवारीकडे मी उगाच बघत बसलो होतो. जुन्यापुराण्या बंदुका आणि पिस्तुलं बघून मला मोठी गंमत वाटत होती.

नोकर बाहेर गेल्यावर मी म्हणालो, ‘‘खरंच, हे सारं नाटक आहे!’’

‘‘कोणतं?’’

‘‘हे सारं, आपण दोघं!’’

दादा हसले आणि म्हणाले, ‘‘माणसाचं सारं आयुष्य हे एक नाटकच नाही तर काय? जग ही एक रंगभूमी आहे आणि आपण सारी माणसं ही त्या नाटकातील पात्रं आहोत. तू ‘ॲज यू लाइक इट’ हे नाटक वाचलं आहेस का?’’

मी त्यांच्या या प्रश्नाचं उत्तर दिलं नाही. उलट मी त्यांना प्रतिप्रश्न केला, ‘‘पण या गोष्टीची गरजच काय होती?’’

‘‘म्हणजे या नव्या राज्यघटनेबद्दल तू विचारतो आहेस?’’

‘‘होय.’’

माझा प्रश्न ऐकताच मस्तक मागं झुकवीत दादा मनसोक्त हसले. ते अशा रीतीनं जेव्हा हसत तेव्हा एखाद्या निरागस बालकाप्रमाणे त्यांचं ते हसणं भासत असे. बघता-बघता त्यांच्या मुद्रेवर छाया-प्रकाशाचा असा काही मिलाफ झाला की, त्यांच्या कातीव देखण्या मुद्रेवर मला एक प्रकारचा कठोरपणा दिसू लागला. केवळ पांढऱ्या आणि काळ्या अशा दोनच ढोबळ रंगांचे फटकारे मारून एखादं चित्र रेखाटावं तशी त्यांची ती मुद्रा भासू लागली.

हा काहीसा चमत्कारिक विचार माझ्या मनात सुरू असतानाच दादा म्हणाले, ‘‘हिंदी फेडरेशनच्या राजनैतिक खात्याचीच अशी इच्छा नव्हे आग्रह होता की, संस्थानिकांनी आपल्या संस्थानात जबाबदार राज्यपद्धती सुरू करावी.’’

‘‘आणि तुम्ही ज्या प्रकारानं ती सुरू करणार आहात तो प्रकार यथायोग्य आहे, असंच त्या राजनैतिक खात्याचं मत आहे ना?’’

‘‘होय. अगदी तंतोतंत तेच मत आहे. त्यांची अगदी खुशी आहे!’’

दादांच्या बोलण्यातील उपहास मला जाणवला. अगदी अलीकडे राजनैतिक खात्याशी त्यांनी चांगलेच जवळचे संबंध बांधले होते आणि स्वत:वर कोणत्याही प्रकारचा ठपका न येता ते संबंध अधिक दृढ कसे होतील इकडे त्यांचं सदैव लक्षही होतं.

मी त्यांना विचारलं, ‘‘पण प्रजेचं काय? राष्ट्रीय चळवळ करणाऱ्या देशभक्तांचा तुमच्या नव्या राज्यघटनेला साफ साफ विरोध आहे.’’

हेटाळणीच्या स्वरात दादा उत्तरले, ''म्हणे देशभक्त! गुंड! व्यापाऱ्यांची व वकिलांची फूस असलेले गुंड!''

राष्ट्रीय चळवळीच्या पुढाऱ्यांबद्दल दादांना मनस्वी तिरस्कार वाटत असे. ब्रिटिशांचं आणि संस्थानिकांचं पूर्वापार वैर होतं; कारण विश्वासघात करून त्यांनी ते राज्य लुबाडलं होतं; परंतु ती फार जुनीपुराणी गोष्ट होती आणि ब्रिटिशांच्या वर्चस्वापुढे मुकाट्यानं मान तुकविण्याची संस्थानिकांना आता सवय झाली होती; परंतु या नव्या काळात स्वराज्याच्या चळवळीचे पुढारी हे संस्थानी सत्तेचे दुष्मन बनले होते. संस्थानी जनता मूळची राजनिष्ठ; परंतु या चळवळ्यांनी त्या राजनिष्ठेवरच आघात करायला आरंभ केला होता. स्थानिक राजसत्तेशी उघड-उघड वैर धरलं होतं. ब्रिटिशांच्या आक्रमक झंझावातातून जे सुटलं होतं ते संस्थानिकांपासून हिरावून घेण्याची त्यांची सगळी सिद्धता होत होती.

क्षणभरानं दादा अधिकच हेटाळणीच्या स्वरात म्हणाले, ''या पुढारी मंडळींची मनं दुखावतील की काय इकडे लक्ष देण्याची मला मुळीच गरज वाटत नाही. माझ्यापुरतं म्हणशील तर मी त्यांना मुळी मोजीतच नाही.''

''न मोजून कसं चालेल? त्यामुळे त्यांचं अस्तित्व थोडंच नष्ट होणार आहे? ब्रिटिशांच्या प्रदेशांत ते प्रचंड बहुसंख्येने निवडून आले आहेत आणि प्रत्यक्ष राज्यकारभारही हाकू लागले आहेत.''

या माझ्या बोलण्यावर दादा काहीसे रागावून म्हणाले, ''कधीकधी तू त्या या मंडळींसारखाच बोलतोस! अशावेळी वाटतं की, तुला त्यांचा राजद्रोह मान्य आहे, तुझा त्यांना पाठिंबा आहे, त्यांची कृत्ये तुला पसंत आहेत. त्या हलकट पोराला आम्ही चाबकाचे फटके मारले होते ना? त्या पोरासारखं तुझं बोलणं वाटतं. काय बरं त्याचं नाव? हो! कनकचंदच नाही का तो? ढोराचं पोर! पहिल्या फटक्यालाच त्यानं अशी काही आर्त किंकाळी फोडली होती म्हणतोस. आता त्याचा आवाज पार बंद झाला असेल, नाही का?''

दादांनी त्या चांभाराच्या पोराला खरोखरच बेदम फटके मारले होते. गेली सात वर्षं ती गोष्ट माझ्या मनाला शल्यासारखी बोचत राहिली होती. माझ्याशी बोलताना दादांनी त्या पोराच्या नावाचा आता हा असा प्रथमच उल्लेख केला होता. त्या पोराला त्यांनी चारचौघांसमोर फटके मारले होते. त्यांच्या बोलण्यात कनकचंदाच्या नावाचा उल्लेख यावा याचं मला आश्चर्य

वाटत होतं आणि दादा मला विचारीत होते, ''आता त्यांचा आवाज पार बंद झाला असेल नाही का?''

मी म्हणालो, ''तशी त्याची-माझी बातचीत पार बंदच आहे. त्याचं कॉलेजचं हे वर्ष आहे. तो चांगल्या रीतीने पास होणार हे ठरल्यासारखं आहे. नंतर तो वकिलीचा अभ्यास करणार आहे.''

यावर दादा उद्वेगानं म्हणाले, ''या गोष्टीचं सारं श्रेय तुला आणि तुझ्या आईला आहे. नाहीतर ते ढोराचं पोर जन्मभर कातडी साफ करीत बसलं असतं. आणि या गोष्टीचं तुला फळ काय, तर त्यानं तुझ्याशी धरलेला अबोला! अरे, ज्यांना मदतीचा हात द्यायचा त्यांची जरा लायकी तरी बघायची होतीस! लक्षात ठेव, हे लोक शेवटी जातीवरच जायचे!''

कनकचंदाच्या शिक्षणाला खरोखरच माझ्या आईकडून साहाय्य होत होतं; पण ही गोष्ट दादांना ज्ञात असल्याचं मला त्या क्षणापर्यंत तरी माहीत नव्हतं. ती गोष्ट दादांपासून लपवून ठेवण्याचं मलाही काही कारण नव्हतं. मी म्हणालो, ''त्या परिस्थितीत त्याला मदत करणं योग्यच होतं. मुलगा अभ्यासू होता. लवकरच तो उत्तम वकील होईल.''

''होय. ते अगदी खरं आहे. वकील झाल्यावर तो राजकीय पुढारी बनेल. सारेच वाट चुकलेले वकील अखेरीस पुढारी बनतात, तसाच तोही. वर तो आमच्या विरोधकांच्यात सामील होणार!''

दादांच्या बोलण्यात नापसंती स्पष्ट दिसत होती. तरीही मी म्हणालो, ''ब्रिटिशांनाही या राजकीय पुढाऱ्यांसमोर मान तुकवावी लागली आहे.''

''होय. ते अगदी खरं आहे. वकील झाल्यावर तो राजकीय पुढारी बनेल. सारेच वाट चुकलेले वकील अखेरीस पुढारी बनतात, तसाच तोही. वर तो आमच्या विरोधकांच्यात सामील होणार!''

दादांच्या बोलण्यात नापसंती स्पष्ट दिसत होती. तरीही मी म्हणालो, ''ब्रिटिशांनाही या राजकीय पुढाऱ्यांसमोर मान तुकवावी लागली आहे.''

'ते सारं ठीकच आहे. भले त्यांची परस्परांत जुंपू दे. वास्तविक ते दोघंही आमचे वैरीच! आम्हाला त्यांच्यापैकी कोणीच नको आहे. ब्रिटिशांच्या उरात या पुढारी मंडळींमुळे चांगलीच धडकी भरली आहे. त्यामुळे ब्रिटिशांच्या मैत्रीचा मोहरा आमच्याकडे वळला आहे. आम्ही संस्थानिकांचे ते दोस्त बनले आहेत.''

दादांचं म्हणणं मला पटलं नाही. मी म्हणालो, ''खरोखर ब्रिटिशांची ही रीत अजबच म्हणावी लागेल. कॉलेजात या विषयावर व्याख्यानं झोडताना हेच ब्रिटिश प्राध्यापक आपल्या मायदेशांतील लोकशाहीची कोण महती गातात आणि इथे आम्हा संस्थानिकांशी हातमिळवणी करून जनतेच्या मूलभूत हक्कांची पायमल्ली करण्यात यांना काहीच वावगं वाटत नाही!''

माझं हे बोलणं ऐकत असताना दादा माझ्याकडे चमत्कारिक दृष्टीने बघत होते. मी पुढे एकही शब्द उच्चारला नाही. मग मान डोलवीत ते म्हणाले, ''अरे पोरा, इतक्या लवकर तुला एवढी शिंगं फुटली?''

त्यांच्या बोलण्याचा नेमका अर्थ मला कळला नाही. असं काहीतरी सुभाषित- वजा बोलण्याची त्यांची रीत माझ्या परिचयाची होती. मी म्हणालो, ''भारतीय जनतेच्या राजकीय पुढाऱ्यांच्या विरुद्ध जाऊन संस्थानिकांची बाजू उचलण्यात ब्रिटिशांचा हेतू काय असणार?''

''हे पाहा, तो मुद्दा नाही. ब्रिटिशांना आज आपल्या पाठिंब्याची फार गरज आहे; कारण पांढऱ्या टोपीवाल्यांची त्यांनी धास्ती घेतली आहे. या गोष्टीचा आपण पुरेपूर लाभ उठविला पाहिजे. आपले सारे हक्क पुन्हा प्रस्थापित करून घेण्याची, वेड्या हीच वेळ आहे.''

माझं राजकारणाचं पुस्तकी ज्ञान एकदम जागृत झालं. मी दादांना विचारलं, ''तुमचे ब्रिटिशांशी पुष्कळ कराररमदार झाले असतील; पण प्रजेच्या इच्छेविरुद्ध आता ते थोडेच तग धरू शकणार आहेत?''

परंतु, माझ्या या बोलण्याकडे दादांचं लक्ष होतं कुठे? एखाद्या स्वप्नात गढल्याप्रमाणे त्यांची मुद्रा दिसू लागली. स्वप्नातच असल्याप्रमाणे ते बोलू लागले. त्यांचा आवाज मंदावला. कानात कुजबुजावं तसं ते म्हणाले, ''काली नदी ही आपल्या राज्याची मर्यादा राहील - काली आणि नाशी! राजकीय पुढारी परस्पर ब्रिटिशांच्या नरडीचा घोट घेतील तर खुशाल घेऊ देत! त्यामुळे ब्रिटिश कमजोर बनतील. आपले हात तेवढेच बळकट होतील.''

''पण हे घडणार कसं? भारताला स्वातंत्र्य मिळताच ब्रिटिशांना हा देश सोडावाच लागेल. त्यावेळी संस्थानिकांची काय अवस्था होईल?''

एकदम त्यांच्या मुद्रेवरील स्वप्न विरलं. स्वप्नांतून ते जणू पुन्हा जागृतीत आले. ते म्हणाले, ''हा देश सोडून ब्रिटिश कदापि जाणार नाहीत. छे, छे! त्या गोष्टीचे नावसुद्धा काढू नकोस.''

हे बोलताना त्यांचा स्वर एकदम चढा झाला. त्यांची मुद्रा रागीट दिसू लागली. त्यांचे डोळे तांबारले आणि त्यांच्या चेहऱ्यावरच्या शिरा स्पष्ट दिसू लागल्या. त्यांच्या चेहऱ्यावरील सौंदर्य पार पुसून गेल्याचा मला भास झाला. जेव्हा दादा रागाच्या आहारी जात तेव्हा ते थेट पहिल्या अभयराजांसारखे दिसू लागत. माझंही नाव अभयराजच; पण पहिल्या अभयराजांचं नाव 'उपप्रकृती अभयराज' असं होतं. एकदा तर त्या अभयराजांनी जुन्या किल्ल्याच्या भिंतीवर स्वत:च्या हाताने बळी घेतलेल्या शत्रूंच्या रुंडमाळा लटकावल्या होत्या!

दादांच्या तोंडावर मला पहिल्या अभयराजांचं ते रूप दिसू लागलं; मात्र त्यांचा आवाज चढला नव्हता. ते शांतपणानं बोलत होते. ते म्हणाले, ''छे, छे! असं पाहा अभय, ब्रिटिश लोक हा देश कधीच सोडणार नाहीत. किंबहुना, ते हा देश सोडून जाणार नाहीत अशीच पावले आपण टाकली पाहिजेत. त्यातच आपला फायदा आहे. ब्रिटिशांचं आसन इथे कायमचं कसं राहील याकडे संस्थानिकांनी दरोबस्त लक्ष द्यायला हवं.''

''याचा अर्थ राष्ट्रीय चळवळीच्या पुढाऱ्यांविरुद्ध हातमिळवणी करायला हवी!''

दादा ठासून म्हणाले, ''अर्थातच! आपण नेहमीच ब्रिटिशांचा पाठपुरावा करायला हवा. अगदी नेहमी! तुला माहीत आहे की, मी काही ब्रिटिशांचा दोस्त खास नाही. मुळीच नाही. गांधीजी त्यांचा काय तिरस्कार करतील, एवढा मला ब्रिटिशांचा तिरस्कार वाटतो. गांधींना रेल्वेच्या डब्यांतून फक्त बाहेर फेकून देण्यात आलं होतं; पण माझ्या आजोबांचं विचार! राज्याच्या रेसिडेन्टला कुर्निसात करण्याचं नाकारल्याबद्दल त्यांना वेडं ठरविण्यात आलं आणि त्यांची हकालपट्टी करण्यात आली. माझ्या पणजोबांचीही तीच गत. त्याच कारणासाठी त्यांना बंडखोर ठरविण्यात आलं आणि विश्वासघातानं ब्रिटिशांनी आमचं राज्य लुबाडलं; पण तरीदेखील या गांधीवाद्यांपेक्षा मला एका अर्थानं हे ब्रिटिश परवडतील; कारण ब्रिटिशांच्या पाठिंब्यावरच आपलं हे राज्य इथे कायमचं टिकणार आहे आणि हीच गोष्ट सर्वांत महत्त्वाची आहे. होय, आपल्या प्राणापेक्षाही! तुझ्या आणि माझ्याही! ब्रिटिशांच्या संगीनींच्या बळावर जर आपलं राज्य टिकणार असेल, तर आपण त्या संगीनी उचलून धरल्या पाहिजेत. त्या बळावर आपले बेगवाडचं राज्य आपल्या बेडर वंशाकडे कायमचं राहील असं केलं पाहिजे.''

दादांच्या या बोलण्याचा मला मनस्वी राग आला. वस्तुस्थितीकडे बुद्धिपुरस्सर पाठ फिरविण्याची त्यांची ही वृत्ती मला मुळीच रुचली नाही. त्यांना टोमणा मारण्याच्या हेतूनं मी म्हणालो, ‘‘पण अखेरीस हिंदुस्थानच्या भवितव्याशीच बेगवाडची गाठ मारली जाणार आहे ना? निजाम किंवा वाडियार या बड्या संस्थानांपेक्षाही हिंदुस्थान देशाचं सामर्थ्य आणि शान बडी आहे. या संस्थानांपेक्षाही या देशाचा वारसा मोठा आहे. तिथे आपल्या या छोट्या संस्थानाची काय कथा!’’

मला पुष्कळ बोलायचं होतं; पण मी थांबलो. मी माझी मर्यादा ओलांडली होती, या गोष्टीची मला जाणीव झाली. पांढऱ्या गालिचाच्या पार्श्वभूमीवर मला दादांचा उग्र चेहरा दिसत होता. ते माझ्याकडे रोखून बघत होते. त्यांच्या मुद्रेवर दुःख उमटलं होतं, त्यांना कसलातरी धक्का बसला आहे, असं वाटत होतं; आणि त्याहीपेक्षा ते परमावधीचे क्रोधाविष्ट झालेले दिसत होते. रागात सर्वस्वी बुडालेली त्यांची अशी मूर्ती मी यापूर्वी कधीच बघितली नव्हती.

त्यांचा आवाजही रागानं कापरा झाला होता. ते मला विचारीत होते, ‘‘तुला कोणत्याच गोष्टीचं पावित्र्य कसं वाटत नाही?’’

त्यांचं ते बोलणं ऐकून मला त्याही स्थितीत समाधान वाटलं. मी त्यांचं चिलखत छेदलं होतं. त्यांना टोचून बोललो होतो. माझ्या बोलण्यानं मी त्यांना त्यांच्या उच्च पदावरून खाली खेचलं होतं. त्यांचा राजेशाही दंभ डिवचला होता. ते आता संस्थानाधिपती उरले नव्हते. एखाद्या सर्वसामान्य पित्यानं आपल्या मुलाची कानउघाडणी करताना बडबडावं तसं ते बोलू लागले. म्हणाले, ‘‘आज ना उद्या तूच या संस्थानाचा अधिपती होशील. त्या तुला आपलं हे संस्थान कस्पटाप्रमाणे वाटावं? माझा या गोष्टीवर विश्वासच बसत नाही. शंका येते की, तू खरंच का माझ्या हाडामांसाचा आहेस? खरंच का माझ्याच पोटचा आहेस? अरे, बेडर वंशातला आहेस ना तू?’’

दादांचं ते बोलणं ऐकून माझ्या मनावरचा माझा ताबा पार सुटला. मी संतापून म्हणालो, ‘‘दादा, तुमच्या बोलण्याला काही ताळतंत्र? असं बोलून तुम्ही महाराणीच्या नावाला माझ्या आईच्या नावाला काळिमा लावीत आहात, याची तुम्हाला जाणीव तरी आहे का? तुमच्या ठिकाणी जर दुसरा कुणी असता तर मी... तर मी...’’

दादा उपहासानं म्हणाले, ‘‘तर काय केलं असतंस?’’

‘‘काय केलं असतं? सरळ श्रीमुखात भडकावली असती. तुम्ही आता जे बोललात ते बोलल्याबद्दल मी त्याला माझ्या पाया पडायला लावलं असतं. खरं म्हणजे आईच्या सावलीलाही उभं राहायची तुमची लायकी नाही, दादा!’’

दादांच्या रागाचा पारा कमालीचा चढला. ते म्हणाले, ‘‘बोललास हे पुष्कळ झालं, चालता हो. समोरदेखील उभा राहू नकोस!’’

मी झट्‌कन उठलो आणि चालू लागलो. जाताना त्यांना मुजराही केला नाही.

दादा करड्या स्वरात म्हणाले, ‘‘थांब! जाऊ नकोस!’’

माझ्या मनाविरुद्ध मी दारात थबकलो आणि वळून त्यांच्याकडे बघितलं.


पुन्हा धिमेपणानं ते बोलू लागले. त्यांचा आवाज मंदावला. त्यांच्या आवाजात आता कंप नव्हता. त्यांची मुद्रा नेहमीप्रमाणे दिसू लागली; मात्र ते आता निस्तेज दिसत होते. माझ्याकडे बघून ते म्हणाले, ‘‘पोरा, एक गोष्ट लक्षात ठेव. तुला कुणी काहीही सांगितलं तरी आपलं हे बेगवाडचं राज्य यावच्चंद्रदिवाकरौ टिकणार आहे आणि त्या राज्याची सूत्रं आपल्या घराण्याकडे परंपरागत राहणार आहेत. जा, आता खुशाल जा!’’

दादांचे ते शब्द नंतर कितीतरी वेळ माझ्या कानांत एकसारखे घुमत राहिले होते.

◆

**नवी संहिता... नवा आशय...**

# अकबर
## ऑफ हिंदुस्थान




**पार्वती शर्मा**


अनुवाद

**प्रशांत तळणीकर**

उत्तम योद्धा, महान प्रशासक, अनेक तत्त्ववादाचा पुरस्कर्ता असलेल्या अकबराच्या समग्र जीवनकालाचा यथासांग पट मांडणारे चरित्र.

**किंमत : ६६०/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

# जहांगीर




**पार्वती शर्मा**


अनुवाद

**प्रशांत तळणीकर**

मुघल सम्राटांपैकी सर्वांत आकर्षक आणि कला व निसर्गसाधनेचा परिपाठ गिरवणारा संवेदनशील राजकुमार सलीम अर्थात जहांगीरची जीवनगाथा

**किंमत : ३७०/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

## पुस्तकाच्या पानांतून




# छन्नाशी

**महादेव मोरे**

*कुठे संशयपिशाच... तर कुठे तारुण्याचा बाजार...*
*कुठे एकटेपण... तर कुठे हलक्या कानाचा विकार...*
*विकारवश जगाचं व्यामिश्र चित्रण*

## छडीटांग

चैत्राची ऐन दुपार डोक्यावर घेऊनच जावयाने जानबाच्या घरात पाऊल टाकलं.

नुकतंच जेवण उरकून, वर आख्खी चिलीम खलास

करून जानबा 'शिवा ऽऽ' म्हणून लवंडला होता. आता एक झक्कासपैकी अगळपगळ झोप काढावी असा त्याचा सुरेख बेत होता. तोवर ही आफत आली होती!

'लै ऊनाचं येनं केलंसा?' जानबाने थोड्याशा कुगरूमीपणाने पण साळसूदपणे सवाल केला.

जावाई जात्याच गरीब होता. आपल्या मामाच्या बोलण्यातली मेख त्याला कळलीच नाही. तो मवाळपणे म्हणाला–

'व्हय्. किती म्हैने वाट बघायची? शारीला आज लावून देशीला, उद्या लावून देशीला म्हणून कशीतरी कड काढली आतापतोर. पर आता लै खुळांबा झालाय.....'

'ते खरं हो ऽ. पर हितला तंबाखूचा सिजन संपू दे, मगसन् लावून द्यावं–आसं यवजलतं मनाशी...'

'आनि आता लावून द्यायला कुटं घोडं पेंड खातंय् म्हंतो मी? शेताभातात मशागत करायचं दिवस ह्या. हा हा म्हणूस्तरका दिवस सरतील आनि वळीव झोडपायला लागंल, तवा मग डोळं उघडायचं नि तारदाळ्या द्यायच्या व्हय?'

तुमचंबी खोटं म्हणत न्हाई मी. पर पोरीची जात हाय. म्हायारची वढ यवढ्या लौकर कशी संपायची? तवा आणिक काई दिवस ऱ्हावू दे...'

मामा असा नस्ता घोळच घालत राहिला, तसा जावई तरबत्तर झाला. एकदम खडसावून निर्णायक स्वरात त्यानं विचारलं,

'ते काई सांगू नका. झालं हे बास्स झालं. एकच सांगा. शारीला देता लावून का न्हाई?'

'आताच न्हाई!'

मामाचे शब्द ऐकून जावयाचा तोलच सुटला. का ह्येची यवढी मुजोरी? मी का ह्येच्या पोरीपायी लाळ घोटात आलोय? चार लोकाच्या सांगीवांगीनं झालेली लग्नाची बायकू माझी ती आणि ह्यो कोण दीडबेन्याचा 'आताच न्हाई' म्हणणारा! लगनासाठी फुकट रुपय् आठशे

खर्चाय् न्हाईत! बाबा, ते रुपयं फेडायसाठी धन्याच्यात राबून राबून हाताला घट्ट पडल्यात आनि बोजे उचलून उचलून खांदं नि डोई मळून दड्ड पडल्यात! त्याला काव आला. काय तो सोक्षमोक्ष लावून एक घाव नि दोन तुकडे करण्यासाठी तो म्हणाला,

'ह्येच उत्तर न्हवं तुम्चं?'

'व्हय्!'

'घ्या ठेवून तर मग पोर्गीला. लोंचं घाला तिचं! जातो मी. आजपास्न ती मला मेली आनि मी तिला!'

आणि रागारागानं जावई निघून गेला.

जावई तणतणत निघून गेल्यावर जानबा मोठ्या बेरकीपणानं हसला. शांतपणे त्याने चिलीम भरली नि भकाभका धूर सोडीत राहिला. जणू जावई रागावून निघून गेला नव्हताच. जणू पोरीचं सासर तुटल्यागत झालं नव्हतंच!

कामावरनं दुपारच्या दोनच्या सुट्टीत शारी जेवायला म्हणून घरला आली. तरीही हा आपला गडदेबाजपणे लोळतच पडलेला होता. तिनं विचारलं,

'जेवलास व्हय् गा?'

त्याला डुलकी लागल्यावानी झाली होती. त्यामुळं स्पष्ट काही ऐकू आलं नाही. तरीपण त्या आवाजानं त्याला जाग आली. आळस दिल्यावानी, हात झटकल्यागत करीत त्यानं विचारलं,

'कोण श्यारे ऽ कवा आलीस?'

'हे काय, आता ह्येच.'

'जेवलीस?'

'न्हाई.'

'मघा तुजा नव्रा येऊन गेला की ग!'

'काय नव्रा येऊन गेला?' –तिच्या मनात कालवाकालव माजली –का आलाता? मला बलवायला? मग न्हायला का नाही? का बा त्येला उणंदुणं बोलला? ती आपल्याच मनाशी प्रश्न विचारीत राहिली.

त्याची आपणच उत्तरं शोधत राहिली. क्षणभरच अशी कोवळी भावना मनावर फुंकर मारून गेली. दुसऱ्याच क्षणी ती खुदकन् हसली. हेटाळणी केल्यागत हसली, म्हणाली,

'काय म्हणत हुता भाड्या?'

'बलवायला आल्ता तुला!'

'ईल की बलवायला!' बिरोबाच्या डोलकाठीगत हात नाचवीत ती म्हणाली. 'शेताभातात मशागतीची कामं तटली असतील, तवा फुकटचा योक गडी पायजे असंल–रांधाय वाडाय्, कामं उपसाया! खरं कोण तटलंय् तितं जायाय्? काय हाय त्या खुराड्यात!'

तिला नवऱ्याचं ते खेडेगाव म्हणजे खुराडा वाटायचा अन् इथे निपाणीत मात्र ती मजेत असायची. तिथं खेड्यात काय होतं? दोन वेळा कशीतरी मेटाकुटीनं पोटाची खळगी भरायची, पडलंनडलं घरकाम वडायचं आणि उन्हातानाचं धा-बारा आण्याच्या रोजगारासाठी रानामाळात, शिवाराआवारात राबराब राबून रक्त आटवायचं! जनावरागत काम नुस्तं! आणि इथं? इथं काय नव्हतं? सगळं होतं. अन् विशेष म्हणजे पैसा आणि स्वातंत्र्य. तंबाखूच्या खळ्यात भरपूर काम होतं. आठवड्याला रातपाळ्या, पहाटपाळ्या धरून २०-२५ रुपये तरी पगार अगदी घसघशीत पडायचा, त्यातलं ५-७ रुपये आपणाजवळ ठेवून बाकीचे ती घरात 'बा'कडे द्यायची. त्या ५-७ मध्ये आठवड्याला एखादादुसरा सिनेमा, कामाच्या वख्तीच्या, भजी, चिवडा, लाडू असलं चांगलचुंगलं खाणं, शिवाय 'सोतंत्र.' कुणाची ताबेदारी नाही. नवऱ्यागत कुणाचा दरारा नाही. यामुळे ती अगदी मोकळ्या अंगाने हुडावानी वाढली होती. मातलेल्या डुकरिणीगत झाली होती. तशीच ताकदवान, घनगंभीर. प्रत्येक अवयव पोलादी रगापासून बनविल्यागत घाटदार, कठीण वाटाण्यासारखा. रंग असा तसा सावळाच, पण नाक तरतरीत आणि डोळे असे पाणीदार की, ते तसे नसते तर तिची सर्वसामान्य दहाजणीत गणना व्हायची. तिच्या त्या डोळ्यांमुळे नि रसरसीत बांध्यामुळे ती फार आकर्षक वाटायची. अन् ह्या सर्वांवर कडी म्हणजे गुलमोहरागत

धुमसतं, सळसळतं तारुण्य तिच्या अंगोपांगाला ढुश्या मारायचं, आणि ह्या सर्वांचा एकच असा परिणाम व्हायचा की, तिच्या 'बा'ने लग्नासाठी हुडकून आणलेल्या तरुणाला ती एकदम पसंत पडायची!

तिचं उसळतं तारुण्य हेच तर तिच्या बाचं भांडवल होते. त्याची घारीगत बेरकी नजर गरीब, परिस्थितीने नाडलेल्या-अडलेल्या अशा अश्राप तरुणांना शोधत असायची. असे अविवाहित खेडूत तरुण त्याच्या नजरेचे भक्ष्य असायचे. कशाचा आगापिछा विशेष नसलेले, नात्यागोत्याची फारशी माणसं नसलेले, कुणीतरी तालेवार पाटलाच्यात किंवा बामणा-इनामदाराच्यात वाकरी करून भाकरीशी तडजोड केलेल्या तरुणांना तो निवडायचा. त्यांना आपली पोरगी शारी दाखवायचा. पसंती व्हायची. देण्याघेण्याच्या याद्या तयार व्हायच्या, मुहूर्त काढला जायचा आणि त्या पोरग्याच्या गळ्यात पोरगी बांधून 'द्याज' उपटून हा रिकामा व्हायचा! बामणांच्या जातीत जसा पोरीनं पोरग्याला हुंडा द्यायचा असतो, तसा कुर्वाड्यामध्ये पोराने लग्नाचेवेळी पोरीला 'द्याज' म्हणून आपल्या ऐपतीप्रमाणे रक्कम द्यावी लागे. शेसव्वाशेपासून दीड-दोनशेपर्यंत मिळणाऱ्या 'द्याजा'साठी तिचा बा लालचावलेला असे. पोरीचं लगीन झाल्यावर ह्या 'द्याजा'वर त्याची चैन चालायची. साऱ्या पावसाळाभर पुढे मग त्याला हे पैसे पुरेसे व्हायचे. पावसाळा संपेपर्यंत कसेतरी नवऱ्याच्या घरी नांदवल्यागत करायचे नि मग उन्हाळ्याच्या सुरुवातीस जी आणायची ती पाठवूनच द्यायची नाही... उन्हाळ्यामुळे अर्थात् वखारी 'खोललेल्या' असायच्या अन् खळ्यात तंबाखूचं काम चालू झालेलं असायचं. आणि असं काम सुरू झालं की तिला कामाला जाऊ लागण्यास सांगण्याबद्दल बालाही जरूरी लागायची नाही. कारण ती आपसुकच कामाला जाऊ लागायची. तिलाही 'सोतंत्र'पणाची हाव होतीच. होटेलातलं चांगलंचुंगलं खाण्याची आस होतीच. चांगली चांगली इरकली लुगडी नि सोलापुरी चोळ्या नेसाय् वापरायची हौस होतीच आणि हे सर्व कामाला न जाता घरीच बसून कसं शक्य होतं? आणि नवऱ्याच्या घरी नांदून कसं शक्य

होतं? त्याला खळीच हुडकायला हवी होती. दिवाणजी लोकांच्या, मुकादमिणीच्या ओळखी करायला हव्या होत्या. आठवड्याला वीस-पंचवीस तरी मिळवायला हवेच होते. बाच्या डोंबलावर त्यातला वाटा घालायलाच हवा होता आणि आपल्यासाठीही काही भाग स्वत:जवळ ठेवून घेणं तर अर्थात् कमप्राप्तच होतं.

ह्या विचित्र प्रकाराविरुद्ध जोरदार विरोध करणारं असं घरचं कोणीच नव्हतं. आई होती ती दहा-बारा वर्षापूर्वीच पिलेगाच्या तडाख्यात आटपली होती, थोरली भन् होती ती तिकडे लांब कऱ्हाड साताऱ्याकडल्या बाजूस. तिचा दाल्ला तर तिला इकडे पाठवूनच देत नव्हता. तिच्या पाठवरचा भाऊ दिनू होता, तो असायचा मुंबैला गिरणीत कामाला. त्याला इकडली खबरबात आली काय नि गेली काय सारखीच होती. तो तिकडे एक दिवशी निरोप आला की ह्या उन्हाळसारी कशीतरी कढ काढा. मग पावसुळ्याच्या सुमारास शारीला घेऊन जा म्हणं!

तसा त्याच्या डोक्यात लख्ख प्रकाश पडला! म्हंजे, तिकडे ही तंबाखूची खळी पूजायला सोकावली वाटतं! त्याच्या मनात विचार आला.

'काय करतीया ती तिथं?' निरोप घेऊन आलेल्या बायजा भार्मलीनीला त्यानं विचारलं.

'करणार काय दुसरं? तंबाखूया कामाला जाती नि घसाघस् राबून केल्याची कमाई बाच्या मढ्यावर घालती!'

'अजूनबी आजारीच हाय बा तिचा?'

'आजारी पडाय् त्येला काय धाड भरलिया लेकरा? चांगला बाभळीच्या खोडावानी टणटणीत हाय! कशाला आसं सांगावं सांगत बसलाईस खुळ्यान्देवऱ्या? जा, घाल ढुंगणावर चार लाथा, आनि झिपऱ्या धरून आण जा वडून! रांड कुठली, सोन्यासारखं दाल्ल्याच्यात नांदल काय, उंडगमल्लीवानी खळीन्खळी धुंडायला चटावून बाच्या डोंबलावर घालतं बसलं! जास्त दिवस ऱ्हाशील तर छडीटांग मारतील बघ तुला. तुजीच नाकाची भोकं वर हुतील नि साऱ्या गावभर हासू

हुईल. श्याणा असशील तर लवकर जा आनि डाव्या पायातल्या पायतानानं बडवत आण गतकाळीला! उड्डाळ रांड कुठली!'

बायजा आपल्या स्वभावासारखी खूप वटवट करीत राहिली आणि बायकोबद्दल या चिडीनं शिरपाचं डोकं तापून इंगोळ झालं. त्याच तिरमिरीनं तो उठला. धन्याकडे जाऊन बायकोला आणायला सासुरवाडीस जातो, असं सांगून एक दिवसाची सवड काढली आणि बाहेर पडला.

मामाच्या घरात जाऊन कर्जवसुली करायला आलेल्या पठाणागत तो बसणार होता. मामाला म्हणणार होता– 'एक शारीला लावून तरी दे, न्हाईतर तिच्यामाज्या पोटाला तरी घाल! तिनं उंबऱ्याच्या बाहीर कामाधामाला म्हणून पाय टाकायचा नाही आणि मीबी टाकणार नाही! आमी दोघंबी बसूनच ऱ्हाणार! काय तुजी ऐपत असली तर घाल आमच्या पोटाला, न्हाईतर दे लावून पोरीला!'

यावर तो लैच आडीचकांड्यावर आला तर धरायच्या शारीच्या झिपऱ्या नि झासूझाम् द्यायचं वादाडात दोन! म्हणायचं,

'रांडं! लै सोकावलीस व्हय् बाच्या हितं ऱ्हावून! लगीन कशाला लावून घेतलंस? माज्या हितं नांदायला का बाच्या हितं ऱ्हावून त्येची 'भरणी' करायला? वाटलं आसंल तुला–ह्यापूर्वी तीन-चार नवऱ्यास्नी जशी छडीटांग मारली तशी ह्येला मारू! पर ह्यो गब्रू गप्प बसायचा न्हाई म्हटलं! झिंज्या धरून बडवत न्हीन गावाला!'

त्या गोमगाल्याने आजबाजूचे लोक जमतील. बायाबाप्पे आपापसांत कुचकुचू लागतील. काही आपणाला समजावू-उमजावू लागतील. तसा आपण तरबत्तर होऊन म्हणायचं, 'ही नांदाय् ईल का बाच्या घरातच तळ मारील?'

'न्हाई, नांदाय् यायला पाहिजे!' कोणी म्हणेल.

'मग तुमीच न्याय तोडा–काय चुकलं माजं? चुकी झाली तर पाच पायतानं मारा की! खरं ही याय् पायजे का नको?'

'व्हय!'

'तेच म्हंतो मी!'

असं म्हणत मामाच्या नाकावर टिच्चून आपण तिला दरादरा ओढीत दाराबाहेर जमलेल्या गर्दीतून बाहेर काढून घेऊन येऊ.

असं मनाशी बेत रचीत, अधल्यामधल्या वाटेने रानशिवारातून, वडीवताडांतून तो सासुरवाडी जवळ करीत होत. पायातील कापशी माटाच्या पायतानानं धुरळा, फुपाटा, तापलेली माती तुडवीत वाट कापीत होता. वणवा लागल्यागत डोईवरील वैशाख उन्हाचीही त्याला फिकीर नव्हती. केव्हा एकदा सासुरवाडीला पोहोचू आणि मामाला नि बायकोला आपला इंगा दाखवू, असं त्याला होऊन गेलं होतं.

वैशाखाच्या ऐन उन्हाचा रणका डोईवर घेऊनच त्याने जानबाच्या घरात पाऊल टाकलं.

नुकतच भरपेट जेवून वर आख्खी चिलीम खल्लास करून जानबा लवंडला होता. एक मगनमस्त झोप काढावी नि उठल्यावर जरा हॉटेलकडे चहा घेण्यासाठी चक्कर टाकावी असा त्याचा बेत होता, तोवर जावईबुवांची धाड आली होती.

‘उनाचंच एन केलंसा!’ सालसबुदपणे त्याने सवाल केला.

‘श्यारीला घेऊन जायला आलोय्! कुठं हाय ती?’ जावयाने सलामी ठोकली.

‘गेलीया तंबाखूच्या कामाला, यिल आता दोनच्या सुट्टीत, पर...’

ते पुढलं काई मला सांगू नकोसा! एक तर तिला मी घिऊन जाणार, न्हाईपक्षी हितंच ऱ्हाणार! तिलाबी भाईर पडू देणार न्हाई नि मीबी भाईर जाणार न्हाई. बसून आमच्या दोघांच्या पोटाला घालावं लागंल!’

मायला, ह्यो तर खमक्या जावाई भेटला की गा! त्याचा एकंदर निराळाच नूर पाहून जानबाच्या मनात विचार आला; अन् तो तोंडाला मिठी घालून तसाच पडून राहिला.

जावयानेही मूग गिळले आणि तोहि मख्खपणे बसून राहिला.

दोन वाजले, नंतर तीन वाजले, चार झाले, पाच झाले तरी श्यारीचा काहीच पत्ता नव्हता!

रांड, कुठं दडी मारून बसली की काय? दोनच्या सुट्टीत जेवायला आली का न्हाई? मी आल्याची 'सूच' तिला कुणी दिली असावी का काय? जावयाच्या मनात आभाळून येऊ लागलं. पण मीबी खमक्या हाय, हितंच बसणार!

'आयला ऽ, पोर आली न्हाई कशी आजून? का दाल्ल्याला बघून पैसपरभारी भाईरच ऱ्हायली? काय झालं आसंल? चौकशी तरी करावी का वखारीकडं जाऊन?' जानबाच्या मनात वादळ उठू लागलं. शेवटी त्यानं स्तब्धतेला फट पाडली.

'वखारीकडं जाऊन चौकशी तरी करावी काय? च्या मारीऽ आली कशी न्हाई आजून ही?'

'चौकशी करा खरं. कुणा तरी शेजाऱ्याच्या पोराला लावून द्या, तुमी जाऊ नका.' जावयाने सावधगिरीने सूचना दिली.

वखारीकडे शेजारच्या एका पोराला पिटाळून दोघेही मुकाट बसून राहिले. पुन्हा स्तब्धतेचा जाड थर वातावरणावर बसला.

पोरगं सांगत आलं, 'खळ्यातली मुकादमीण म्हणाली की, सकाळपासून श्यारी कामाला आलेली नाहीच!'

दोघांनाही आश्चर्य वाटलं! गेली कुठं ही? शोधाशोध करावी की सांजपर्यंत वाट पाहावी?

अशा विचारातच काही वेळ गेला. एवढ्यात गल्लीतला केरबा रक्ताड्या आत आला.

'हंऽ, हे घ्या मंडळी ऽ, परसाद जोतीबाचा.' आणि त्याने दोघांच्या हातावर चिरमुरे-बत्तासं ठेवलं नि जानबाला विचारलं,

'पाव्हणं कोंच्या गावचं गा?'

'आमच्या शारीचा दाल्ला न्हवं काय? तिला बलवायला आल्यात आज. पर कार्टी कामावरनं कुटं घरलाच आली नाही की गा!'

'हात्तेच्या मारी ऽ! मघाशीच आलो न्हवं मी जोतिबास्नं. तवा कोल्हापूरच्या नव्या मोटार ट्यांडावर दुपारीच बघितली बा मी तिला. संगट खळ्यातला हमाल म्हादुबी हुता!'

‘आँ?’ जावयाने तोंड वासलं.

‘काय म्हंता!’ जानबा चाट्शिरी बसता झाला.

जानबाला नि जावयाला दोघांनाही आश्चर्य वाटलं. एक धक्काच बसला. मन सुंद झालं.

‘आनि मर्दा हो ऽ तिची वाट बघत बसलासा व्हय?’ रक्ताड्या बोलला, ‘उपाटली ती कुटं तरी म्हादूसंग. दिक्पाल झाली आता. आगा, तुम्हा दोघास्नी चांगलीच छडीटांग मारली की तिनं!!’


◆


**नवी संहिता... नवा आशय...**

# बनगरवाडी


**व्यंकटेश माडगूळकर**

वैशिष्ट्यपूर्ण भाषाशैली, सुंदर चित्रं आणि समृद्ध जीवनजाणिवा या वैशिष्ट्यांनी युक्त मराठी साहित्यातील एक अक्षर-लेणं




**किंमत : १८०/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

## पुस्तकाच्या पानांतून




# म्हाई

**महादेव मोरे**

*कधी प्रेमी जीवांची उलघाल...तर कधी नरबळीचा थरार...*
*कधी म्हाईची धमाल... तर कधी वासनेचा विखार...*
*ग्रामीण बाजाच्या बहुढंगी कथा*

### म्हाई

कोंबडे केकाटू लागले, तसा गाव गडबडीने जागा होऊ लागला. आज म्हाई आहे याची जाणीव होताच प्रत्येक जणाच्या अंगातला सकाळच्या वेळचा आळस

पार नाहीसा झाला. म्हाईला बोलावलेले पाहुणे अजून येणार होते. दिवस कासराभर वर यायच्या आत त्याची वर्दळ लागली असती... मुल्लाण्याला बोलावून अजून बकरी कापावी लागणार होती. ती कापल्यावर मग हजारो कामं वाट पाहत बसणार होती... त्या कामांच्या विचाराने घरातील कर्तासवरता माणूस आळस आणि पटका झटकून उठला आणि कामास लागला.

सकाळचा चहा पितापिता गणपा भोईट्या आपल्या मुलास म्हणाला,

'काय रे पोरा, काल मुल्लाण्याला लवकर यायला सांगून आलायास न्हवं?'

'आलोय तर! खरं कसं आलं न्हाई त्येच्या बायलीला आजून...!' करता येईल तेवढ्या सौम्य शब्दात आपला राग व्यक्त करीत पोरगा म्हणाला,

'आयला, माजल्यात साली!' कावून भोईट्या म्हणाला, 'बरं, त्येच्या घरला जा आनी लवकर बलवून आण बेट्याला...'

कुठल्या कुठल्या अस्सल शिव्या द्यायच्या याची मनात उजळणी करीत पोरगा मुल्लाण्णाच्या घराकडे निघाला. त्याच्या घराजवळ तो पोचला तेव्हा त्यांच्यासारखेच संतापलेले सदू पाटील आणि बापू खोत मुल्लाण्यावर भरपूर तोंडसुख घेत असलेले त्याला दिसून आले. मुल्लाण्याच्या केविलवाण्या तोंडाकडे नजर जाताच त्याच्या ओठावर आलेल्या शिव्या तिथेच थिजल्या आणि तो एवढंच म्हणाला,

'कवा येतोस गा? येळ व्हायला लागलाय म्हणून घरात बा तुझ्या नावानं आरडा लागलाय, चल बघ लवकर.'

या तिघांपैकी आता कुणाकडे प्रथम जावं असा प्रश्न मुल्लाण्याला पडला, पण सदू पाटलाने प्रथम यायला सांगितलं आहे, हा विचार मनात येताच त्याने दुसऱ्या दोघांची दादा-अप्पा करून कशी तरी समजूत घातली आणि 'जास्त टाईम न्हाई लावत, पाच मिनिटात येतो. काळजी करू नका तुम्ही' असा त्यांना दिलासा देऊन वाटेला लावलं. मग आदल्या दिवशी धार लावून ठेवलेला सत्तूर आणि मदतीसाठी आपल्या तेरा-चौदा वर्षांच्या मुलाला घेऊन तो सदू पाटलाबरोबर निघाला.

पाटलाच्या परड्यात तिघे जण येताच तिथं बांधलेलं बकरं हातात सुरा घेतलेल्या मुल्लाण्याला पाहून जीव तोडून ओरडू लागलं. त्याची धडपड पाहून मुल्लाण्याला गप्प बसता आले नाही. ''बे छिनालके, क्यों खाली पिली गडबड करता है? चूप बैठ!' असे म्हणून उठल्यापासून दुसऱ्याच्या

शिव्या खाणाऱ्या मुल्लाण्याने आपली शिव्या देण्याची हौस भागवून घेतली.

नंतर धडपडणारं बकरं सोडून त्याला खाली पाडण्यात आलं आणि अजूनही जगण्याच्या आशेसाठी धडपडणाऱ्या त्याच्या शरीराला जाम धरण्यात आलं. तेवढ्यात पाटलाच्या पोराने घरातून रक्त साठवण्यासाठी पाच-दहा झाकण्या आणल्या आणि बकरं कसं कापतात हे बघण्याच्या उत्सुकतेनं ते तिथेच उभं राहिलं. मग मुल्लाण्याने आतापर्यंत धडपड करणारं बकऱ्याचं मुंडकं डाव्या हाताने घट्ट जमिनीवर दाबून धरलं अन् उजव्या हाताने त्याच्या मानेखाली एक झाकणी ठेवून त्याच हाताने त्याच्या एका कानापासून दुसऱ्या कानापर्यंत सफाईने सत्तूर फिरवला, तसं झाकणीत लालभडक अन् गरमगरम रक्त साठू लागलं. एक झाकणी भरल्यावर त्याच्या जागी दुसरी झाकणी ठेवली जाऊ लागली. मुंडकं धडावेगळं करूनसुद्धा धडपडणारं, थरथरणारं बकऱ्याचं शरीर हळूहळू शांत झालं.

मग त्या बकऱ्याचे मागचे पाय जवळच्याच एका झाडाला टांगून मुल्लाण्यानं  आपल्या मुलाला मदतीला घेऊन थोड्याच वेळात चामडं वेगळं केलं आणि सत्तूर, हात वगैरे धुऊन तो पाटलाला म्हणाला, 'बरं, पाटील, जाताव आता!'

तसा पाटील उसळून म्हणाला, 'त्येच्या बायली, चाललास? आनी हे तोडनार कोन? तू काय मी? काय तुझा...'

'खरं, आनी लई घर फिरली पायजेत, पाटील. तोडत बसायला टाईम कुठं हाय? तवा तुमीच तोडून घ्या, मोठं धाट...'

'ते काय सांगू नगोस मला, तोडून देऊन मगच जा!' निर्वाणीच्या स्वरात पाटील म्हणाला.

आता जास्त घोळ घालण्यात अर्थ नाही, असा विचार करून, कुरकुर करीत आणि आपला राग पुढ्यात घेतलेल्या लालभडक व अजूनही थरथरणाऱ्या 'गोसा'वर कचाकच सत्तूरचे घाव घालून व्यक्त करीत मुल्लाण्याने त्याचे मोठमोठे तुकडे केले आणि 'दुपारी जेवाय यायला इसरू नगोस!' हे पाटलांचं आमंत्रण घेऊन तो गणपा भोईट्याकडे भरपूर शिव्या खाण्याची तयारी करून निघाला... आणखी बऱ्याच ठिकाणी अशीच 'तयारी' करून त्याला जावं लागणार होतं. आणखी कित्तीएक वेळा आताप्रमाणेच त्याचं सत्तूर बकऱ्यांचं ताजं ताजं गरम रक्त पिऊन आपली कित्येक दिवसांची

तृष्णा भागवणार होतं...

घरोघर बकरी पडू लागली. त्यांचं ताजं मांस चुलीवरील हंड्यात शिजू लागलं. घरातली थोरली मुलं घागरी घेऊन नदीच्या जवळजवळ कोरड्या पडलेल्या पात्रात काढलेल्या झऱ्याचं पाणी आणू लागली. घरातली बायामाणसं भाकरी करू लागल्या. मसाला कुटू लागल्या, भात उकडू लागल्या. या सगळ्याच्या गडबडीनं आणि स्वयंपाकघरातून येणाऱ्या संमिश्र सुवासाने घरं भरून गेली आणि हा वास घेतघेतच एकएक पाहुणा येऊ लागला. सकाळपासूनच्या गडबडीतून नुकतीच जरा उसंत मिळाल्यामुळे ओटीवर टेकून चंची सोडून बसलेला कारभारी 'या पाव्हणं' म्हणून त्याचं स्वागत करू लागला.

मग घोंगडी अंथरली जाऊ लागली. मळ्यातली कोवळी कोवळी ताजी पानं आणण्यात येऊ लागली. मग पान-तंबाखूबरोबर गप्पा आणि दारासमोरील अंगण रंगू लागलं.

गावागावातली लफडी-भानगडी निघू लागल्या. पारींची व सखारामाची भानगड आणि त्यामुळे झालेली बाचाबाची ही आतापर्यंत साऱ्या गावाने चघळून चोथा केलेली हकिकत पुन्हा पहिल्या उत्साहानं चघळून झाली. शेता-पाण्याच्या गोष्टी झाल्या. कुळकायदा, आजचं सरकार, भूदान इत्यादी विषयांवर ठाम व जोरदार मतं मांडली गेली आणि मग शेवटी विषयांचं पेट्रोलच संपल्यामुळे गप्पांची मोटार बंद पडली.

या वेळपर्यंत दुपारचा बारा-साडेबाराचा सुमार झालेला होता. बाहेर चैत्राचं ऊन्ह रणरणत होतं. भयंकर उकडत होतं. अजून जेवण तयार झालेलं नव्हतं. ते झाल्यावर देवाफिवांना नैवेद्य दाखवावा लागणार होता व मग पंगती बसणार होत्या.

पाहुण्यांच्यात बकऱ्याच्या जेवणावर ताव मारायचा म्हणून बहुतेक जण सकाळची न्याहारी न करताच आलेला, त्यामुळे त्यांच्या पोटात कावळे ओरडू लागले. त्यात स्वयंपाकघरातून येणाऱ्या खमंग वासामुळं भर पडली. पाहुण्यांच्या या स्थितीचा त्यांच्या चेहऱ्यावरून अंदाज काढून घरमालक सारखा आत जाऊन विचारू लागला, 'आटपलं काय न्हाई सारं? केवढा येळ हाय अजून?' पण देवांना वगैरे 'निवद' दाखवायचा असल्याने वेळ होऊ लागला. तसा एक पाहुणा दुसऱ्याला म्हणाला, 'चला पाव्हणं, निवांतवानी

आंगुळ तरी करून येऊ या!'

बाहेर चैत्राच्या उन्हाने आणखी जोर खाल्ला होता. नजर ठरत नव्हती बाहेर. मधूनमधून बाहेरील दारातून वारा आत डोकावे, पण आपल्याबरोबर बाहेरील उष्ण झळा घेऊन. अशा या वातावरणात विहिरीत डुंबण्यास जाण्याची कल्पना सर्वांना एकदम पसंत पडली. मग एकानं घरमालकाला सांगितलं, 'जरा आंगुळ करून, थंडगार हुन येताव...'

तसा घरमालक म्हणाला, 'या उन्हाच्या कारात कुठं जाता बाहीर आंगुळीला? गप्प बसा. जेवाण हुईल आता पंदरा मिंटात!'

'आम्ही जास्ती वेळ न्हाई लावत. पाच मिनिटांतच येताव...' असं म्हणून पाहुणे आंघोळीला निघून गेले.

दिवसाचा तास पाऊण तास असाच जातो. कंटाळवाणा, मरगळलेला, उन्हाने झिंगलेला. मग कोणी आंघोळीला गेलेले, कोणी पाहुण्यांचं शेत पाहण्यास गेलेले परत येऊ लागतात. आधीच जेवणास वेळ झालेला असतो, सणावारी हे असे व्हायचेच अशी सोयीस्कर समजूत करून घेऊनसुद्धा मोकळेपणाने बोलण्याच्या मनस्थितीत कोणीच नसतो.

बाहेर गेलेली सर्व पाहुणेमंडळी आल्यावर लगबगीने पानं वाढली जातात व पटापट जागा पटकावल्या जातात. मग वाढून वगैरे होते आणि आता जेवणास सुरुवात होणार असते. इतक्यात नेहमी गावात येणारा, घरावरून गेलेला कासार घरमालकाच्या दृष्टीस पडतो. जेवायला बोलवण्यासाठी तो कासाराच्या नावाने हाक मारतो, पण ती त्याला ऐकू जात नाही. पंगतीला बसलेल्या आपल्या पोराला उद्देशून मग तो म्हणतो, 'सद्या, त्या कासाराला बलीवजा आताच गेला बघ दारातनं!'

मग सद्या नाइलाजाने पानावरून उठून बाहेर जातो आणि कासराभर लांब गेलेल्या कासाराला असेल नसेल तेवढा जोर एकवटून दुपारच्या स्तब्धतेला तडा पाडणारी हाक मारतो. 'अरे ये कासारा, मागं फिर बाबा. बलीवतोय तुला!'

मग कासार मागे वळतो आणि खांद्यावर अडकविलेल्या काकणांचा निनाद करीत दारापुढे येऊन म्हणतो, 'काय, परसुतात्या, कशाला बलीवलईस?'

'कशाला बलीवलईस म्हणून इचारतोस? काय वाटतंय काय तुझ्या जीवाला' परसुतात्या सात्त्विक संतापाने म्हणतो, 'आज गावाची म्हाई हाय,

आन तू उपाशीच जातोय गावात? चल, ये आत... पोटभर जेवून जा.'

'खरं, झालंय माझं...' आपलं जेवण झालं असल्याचं कासार खरं ते सांगणार असतो; कारण थोड्या वेळापूर्वीच एका घरात जेवून तो बाहेर पडलेला असतो.

'सणावारी खोटं बोलू नकोस! गप ये आत!'

'खरं माझं ऐकून...'

'ते काय सांगू नकोस मला. मुकाट्यानं येतोस आत काय उचून आनाय् पायजे?'

बोलल्याप्रमाणे करण्यास हा कचरणार नाही, असा विचार करून कासार आत येतो.

मग स्वयंपाकघरात ऐकू जाणारी हाक मारली जाते. 'अगं ये, ऐकलंस काय? कासार आलाय, त्येलाबी पान वाढून आण...'

थोड्याच वेळात आतून पान आणलं जातं आणि हा वेळपर्यंत हातपाय धुऊन, मोकळी जागा बघून बसलेल्या कासाराच्या पुढ्यात ठेवलं जातं. मग थोड्याच वेळात तीन-चार उदबत्त्या पेटवून पंगतीच्या मध्यभागी लावल्या जातात आणि 'हं, सुरू करा मंडळी' असं मालकाने म्हटल्याबरोबर आतापर्यंत तिष्ठत बसलेली मंडळी जेवणावर तुटून पडतात.

काही वेळाने जेवणं संपतात व पुन्हा घोंगडी अंथरली जातात. चंच्या सोडल्या जाऊन तोंडे पान तंबाखूने भरली जातात. भरल्या पोटाने व तोंडाने गप्पा सुरू होतात, पण थोड्याच वेळात त्या मंदावतात व जांभया द्यायला सुरुवात होते. जेवणामुळे सर्वांनाच सुस्ती आलेली असते, त्यामुळे जो तो जागा मिळेल तिथे थोड्याच वेळात बिनघोरी झोपी जातो. अंधार पडेपर्यंत सारा गाव देवाला सोडलेल्या वळूगत निपचीत पडून राहतो.

मग अंधार पडू लागेल तसा एकएक जण जागा होऊ लागतो – जांभया देत शेजारी झोपलेल्याला उठवीत. नंतर तोंड वगैरे धुऊन जरा पाय मोकळे करावे या विचाराने कोण कुठे, कोण कुठे अशा प्रकारे निघून जातो.

जेवणाचा सुमार होईल तसा बाहेर गेलेल्यांपैकी एकएक जण जमू लागतो. अजून सर्व जण यावयाचे असतात. त्यामुळे ते येईपर्यंत गप्पागोष्टी सुरू होतात. एक पाव्हणा घरमालकाला विचारतो,

'आज रात्री कसलं खेळ तरी हाय काय नाय वो?'

‘आसनार तर! घराघरातनं चार-चार आनं, दोन-दोन आणं अशी पट्टी जमा केलया, आनी मग खेळ कसा नसंल?’

‘कसला खेळ हाय म्हनं?’

‘अर्जुनीच्या मांगाचा तमाशा हाय म्हनत्यात बा!’

‘चांगला तरी हाय म्हनं?’

‘हाय, बरा हाय म्हनं, खरं तर भाऊ मांगाच्या तमाशाची सर कुणाला यायची न्हाई बघा!’

‘हाऽ रे हाऽऽ, तमाशा बघावा तर भाऊ मांगाचाच! खरं त्यो मेला म्हनं हो?’

‘काय म्हणता मेला? अरेऽरे, वाईट झालं... मग त्येचा फडबी मोडला आसंल?’

‘मोडायला न्हाई दुसरं कुणीतरी चालिवतंय म्हनं.’

अशाच प्रकारे आणखी काही वेळ जातो आणि हाक येते,

‘अहो, ऐकलं काय? जेवून घ्या म्हणावं सगळ्यास्नी. मागनं आनी गडबड नको.’

मग हातपाय धुवून पंगती बसतात व दुपारच्याच जेवणावर ताव मारतात. जेवणापूर्वी कुणी कुणी घेतलेलीही असते. हा वेळपर्यंत रातचा नऊचा सुमार झालेला असतो. धोंडीबा साळव्याच्या घराजवळ असलेल्या चौकात तमाशा होणार असतो, तेव्हा तिथे एकएक जण जमू लागतो. आणि तिथेच घोळक्या घोळक्याने गप्पा झडू लागतात. पोरंटोरंही जमून उगीच कालवा करू लागतात. एकमेकांबरोबर भांडण काढून आपल्या तोंडांना आणि हातापायांना मेहनत देऊ लागतात.

हळूहळू वेळ होऊ लागतो, पण स्टेजचा पत्ता नसतो की तमाशेवाल्यांचा पत्ता नसतो. मग लोक चडफडू लागतात,

‘आयला, हे पंच हाईत का स्वांग हाईत? धा वाजायचा टाईम झाला तरी आजून कशाचाच पत्ता न्हाई!’

असाच आणखी काही वेळ जातो, मग एकएक पंच येऊ लागतो आणि गावातील तरण्याताठ्या पोरांकडून स्टेज घालण्याचं काम करून घेऊ लागतो.

मग गणपता भोईट्याच्या परड्यातील गराड्याची दगडं आणली जातात.

ती एका कोपऱ्यात चौकोनाकृती एकमेकंवर रचली जातात आणि आत निर्माण झालेल्या पोकळ जागेत जवळचीच माती टाकण्यात येते. अन् फूट दोन फूट उंचीचं स्टेज तयार होतं. नंतर पुढच्या बाजूच्या दोन कोपऱ्यांत दोन काठ्या रोवून त्यांना एक आडवी काठी बांधण्यात येते आणि तिला एक गॅसबत्ती टांगण्यात येते.

थोड्या वेळानं तमाशे-मंडळी येतात. पाच सहा पुरुष आणि एक नाचणारीण– काळी-सावळी अन् हिरवं लुगडं नेसलेली. मग डफ हालगीवाले तिथं जवळचा चगाळा गोळा करून डफ-हालगी शेकू लागतात. तुणतणंवाला तार ठीक लावू लागतो आणि सुरपेटीवाला कुरकुर करू लागतो,

‘आजून हितं टेबल नाही, खुर्ची नाही. मी काय भुईवरच बसून वाजवू काय हो?’

‘बरं, बरं, यवस्ता करताव त्येची’ असं म्हणून एक पंच बाजूला जातो आणि दोघातिघांना हाळी मारून म्हणतो,

‘तेवढी शाळेतली टेबल खुर्ची आणा जावा बघू चाटक्यानं!’ तशी ती लोकं शाळेकडे पळतात व थोड्याच वेळात टेबलखुर्ची घेऊन येतात.

मग टेबलावर सुरपेटी ठेवून सुरपेटीवाला सूर काढू लागतो. आतापर्यंत गरम केलेल्या डफावर थाप पडू लागते. या आवाजात तुणतुण्याची ‘तुंई तुंई’ मिसळते आणि ढोलकीच्या ठेक्यावर नमनास प्रारंभ होतो. न समजणारं आणि गोंधळाप्रमाणं वाटणारं नमन एकदाचं संपतं अन् ‘खऱ्या’ तमाशास सुरुवात होते. राधा-कृष्णाच्या हरएक तमाशात हटकून असणाऱ्या लीला सुरू होता. राधा अर्थात नाचनारीण होते आणि तिच्या सखी सोंगाड्या आणखी दोनतीन पुरुष बनतात! या राधेच्या सखी पुरुषाच्या पोषाखात जरी असल्या तरी त्या ‘स्त्रिया’च समजायच्या! मग या गवळणी (स्टेजवरून गोल चकरा मारीत) मथुरेला दूध घालण्यास जाऊ लागल्या. वाटेत त्यांना (आतापर्यंत जवळच्याच टेबलावरील मोकळ्या जागी बसून बिडी ओढणाऱ्या) कृष्णाने नेहमीप्रमाणे हटकलं. त्यांची वाट रोखून धरली. मग राधा आणि तिच्या सख्या विनवण्या करू लागल्या,

‘किस्ना, सोड बघू आमची वाट! उशीर झाला तर आमची सासू चावून खाईल, आमाला!’

फारच विनवण्या आणि गवळण बनलेल्या सोंगाड्याने काही ‘इनोद’

केल्यावर कृष्ण म्हणतो,

‘एक फक्कड गाणं म्हंटल्याशिवाय सोडणार न्हाई तुम्हांला! हंऽ आता म्हणा बघू.’

आता गाणं म्हटल्याशिवाय सुटका नाही, असा विचार करून आतापर्यंत अस्सल मऱ्हाटीत बोलणारी ती शेलाटी गुलछडी अंगलट भुईसम वाकडी, आता हिंदीत गाऊ लागली फाकडी...

‘मन डोलेऽ मेरा तन डोले, मेरे दिलका...’

आणि सारे प्रेक्षक डुलू लागले. त्यांच्या हलक्या, फुलक्या बनलेल्या मनावर नशा चढू लागते. त्या नशेत नेहमीच्या विवंचना, चिंता, भांडण-तंटे इ. क्षणभर विसरलं गेलं आणि ते स्वत:ला हरखून बसले. रसगंगेच्या दुथडी वाहत्या प्रवाहात...

(गोखले कॉलेज, कोल्हापूरमधील १९७८-७९ सालातील कथा स्पर्धेत पहिले पारितोषिकप्राप्त कथा.) लेखन नोव्हेंबर १९५८.

(प्रसिद्धी : सा. ‘स्वराज्य’ १० ऑक्टोबर १९५९)


◆

**नवी संहिता... नवा आशय...**

# रुक्की

**महादेव मोरे**

‘रुक्की’तील कथांचा ग्रामीण बाज
वास्तवातील दुःखांवर करतो मात!




**किंमत : १८०/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

**नवी संहिता... नवा आशय...**

TBC-34 Book No. 4

## अ वॉन्टेड मॅन

**ली चाइल्ड**

अनुवाद
**सरिता आठवले**





एक खून आणि विलक्षण गुंतागुंत ...
गुन्हेगार, पोलीस आणि गुप्तहेर संघटना...
तिढा वाढतच जातो... आणि?

**किंमत : ७५०/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

TBC-34 Book No. 5

## यूज ऑफ फोर्स





**ब्रॅड थॉर**

अनुवाद
**जयंत गुणे**

आतंकवाद्यांची पाशवी क्रूरता आणि हार्वथची मानवतावादी निर्भयता
यांच्यातील संघर्षाचं थरारक चित्रण

**किंमत : ७००/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

## पुस्तकाच्या पानांतून




# एका अपरिचित गांधीची आत्मकथा

**नटवर गांधी** अनुवाद **: सुषमा शाळिग्राम**

*मुंबईतील असह्य आर्थिक ओढाताण ते अमेरिकेतील सुसंपन्न जीवन... नटवर गांधींचा संघर्षमय, तरीही यशस्वी जीवनप्रवास*

### सावरकुंडला (१९४०-१९५७)

### नीरस बालपण

२०१६मध्ये हे लिहायला घेतलं तेव्हा माझं वय ७५ वर्षं आहे असं मी म्हणत असलो तरी माझं खरं वय काय आहे देव जाणे! माझा जन्म आमच्या राहत्या घरीच

झाला होता. गावात ना हॉस्पिटल ना प्रसूतिगृह. सुईण घरी येई. आम्ही सगळी भावंडं अशी घरीच जन्मलो. आमच्या जन्माचं प्रमाणपत्र वगैरे मिळणं कठीणच! आजसुद्धा गावी जवळजवळ ५९ टक्के जन्म नोंदवलेच जात नाहीत असं म्हणतात. जन्मदिवसच माहीत नसेल तर वाढदिवस कुठला? माझाच काय, आमच्या घरातल्या कोणाचाच वाढदिवस वगैरे साजरा झालेला मला आठवत नाही.

पोरगा घरात फारच उच्छाद मांडायला लागला, की बाप त्याला शाळेत घालत असे. त्या वेळी बाप सांगेल ते मुलाचं वय. असेच एके दिवशी काका (वडिलांना आम्ही काका म्हणत असू.) मला शाळेत घेऊन गेले. मुख्याध्यापकांकडे गेले. म्हणाले, ''माझ्या मुलाला शाळेत घालायचं आहे.'' त्यांनी जन्मतारीख विचारली तशी म्हणाले, ''मुलाची जन्मतारीख?''

''लिहा- चार ऑक्टोबर.''

''वर्ष?''

तर म्हणे, ''लिहा- १९४०.'' अशी माझी जन्मतारीख ठरली. मुंबईला जाण्यासाठी मी गाव सोडलं तेव्हा अशा तऱ्हेने अधिकृतपणे मी सतरा वर्षांचा झालो होतो. तोपर्यंत बालवयातली आणि किशोरवयातली सगळीच्या सगळी वर्षं मी गावातच काढली होती. सतरा वर्षांचा तो काळ फार मोठा सुखाचा होता, असं मी म्हणणार नाही.

सुप्रसिद्ध रशियन कादंबरीकार व्लादिमिर नाबकोव्ह आपल्या लहानपणीच्या सुखाच्या, लाडाकोडाच्या, आश्चर्योल्हासाच्या आठवणी सांगताना त्यामध्ये अगदी रंगून जातात. बालपणीच्या त्या रम्य आठवणी पुढच्या आयुष्यात त्यांना खूप उपयोगी पडल्या होत्या. 'रशियन रिव्होल्यूशन'च्या वेळी आणि त्यानंतरच्या देशांतरादरम्यान आलेले भयानक अनुभव, भयंकर आर्थिक चणचण आणि वाट्याला आलेले सगळे क्लेश सहन करताना बालपणीच्या त्या सुखद स्मृतींनी जणूकाही ढाल बनून त्यांचं रक्षण केलं होतं.

माझी गोष्ट अगदी याउलट. का कोण जाणे; पण अगदी लहान असल्यापासूनच आपलं हे कुटुंब, हे घर, हे गाव केव्हा एकदा सोडून जातो असं मला वाटायचं आणि जेव्हा खरोखरच सगळं सोडून मी निघालो त्यानंतर परत जावं असं मला कधीच वाटलं नाही. एखाद्याचं शैशव भले नाबकोव्हसारखं श्रीमंती थाटात, लाडाकोडात गेलेलं नसू दे; पण बालसुलभ

आनंद आणि उल्हास लाभणं एवढातरी प्रत्येकाचा हक्क असतो ना? त्यात हा दरिद्री, हा तालेवार असा भेदभाव का असावा? आमच्या कुटुंबात मात्र मी आनंदाचं, उत्साहाचं वातावरण कधीच पाहिलं नाही. आई-वडिलांचं, आजी-आजोबांचं, भावा-बहिणींचं प्रेम मला मिळालंच नाही असं मी म्हणत नाही; पण आवर्जून आठवावेत असे मायेचे, कौतुकाचे क्षण वाट्याला आलेले मला स्मरत नाहीत. का बरं? भावंडांशी कधी लपंडाव म्हणा की दुसरा एखादा खेळ खेळल्याचं, कधी आजी-आजोबांजवळ बसून परीकथा ऐकल्याचंदेखील आठवत नाही. काकांजवळ बसून कधी पाच मिनिटं साधं बोलल्याचंही आठवत नाही; मग वाढदिवसबिवस साजरा झाल्याची तर बातच सोडा!

आजकालच्या काळाच्या मानानं माझं बालपण निव्वळ 'बोअरिंग' होतं असं म्हटलं पाहिजे. घरून सरळ शाळेत जा, शाळेतून तडक घरी या असला प्रकार. घरात कुठली खेळणी अथवा मुलांसाठीची पुस्तकं असल्याचं आठवत नाही. साधे पत्तेदेखील नव्हते तर बुद्धिबळ वगैरे कुठलं? अजूनही मला पत्त्यांचा एकसुद्धा डाव येत नाही. ना कॅरम माहीत, ना बुद्धिबळाचा पट, ना सोंगट्यांचा पट! संगीताचंही तेच! आमच्या घरात हार्मोनिअम, तबला, बासरी असं एखादं वाद्य औषधालासुद्धा नव्हतं तर पियानो कुठला असायला? काका लहान असताना बासरी वाजवत असत असं बा म्हणाली होती, तेव्हा मला खूपच नवल वाटलं होतं. मी त्यांची बासरी पाहिली नव्हती की ऐकली नव्हती. आमच्या घरी, फार कशाला शेजारीपाजारीसुद्धा पहाटे कोणी भूपाळी म्हणतं आहे किंवा संध्याकाळी भजन गातं आहे अशातलं काही नव्हतं. शाळेतही गाण्याचे किंवा संगीताचे तास नसत.

आमच्या गावात वीज आली आणि त्यानंतर म्युनिसिपालिटीचा रेडिओ आला, त्यावेळी पहिल्यांदाच गीत-संगीत ऐकायला मिळालं; पण ते फक्त फिल्मसंगीत. गुजराती सुगम संगीत किंवा रविशंकर, बिस्मिल्ला खाँ वगैरेंच्या शास्त्रीय संगीताचा खरा परिचय झाला तो अमेरिकेला आल्यावर! मुंबईला असताना आर्थिक अडचणींनी मेटाकुटीला आलो होतो; त्यामुळे शास्त्रीय संगीताच्या कार्यक्रमांना, नाटकाला कधीच जाता आलं नाही. भारतीय विद्याभवनाजवळच्या सॅनिटोरियममध्ये एकदा सहा महिने राहिलो होतो; पण तेव्हासुद्धा विद्याभवनामध्ये पाऊल टाकायचं धाडस कधी झालं नाही.

कथा-कादंबऱ्यांमध्ये जत्रांचे, नवरात्रीच्या गरब्यांतल्या मौजमजेचे गमतीदार, मनोरंजक उल्लेख असतात. तसलं काही मी अनुभवलं नव्हतं. मेळ्याला किंवा जत्रेला मुळी मी गेलोच नव्हतो. गावात कधी जत्रा भरल्याचं आठवत नाही. रास-गरबा वगैरे मी कधीही खेळलो नाही. मुलं म्हणे रानावनांत, अगदी वाघ-सिंहांच्या डरकाळ्या ऐकू येतील इतक्या दाट जंगलात जातात; कोणाच्यातरी आमराईत जाऊन कैऱ्या पाडतात, वडाच्या फांद्यांवर बसून झोके घेतात... हे सगळं मी वाचलं आहे; पण कधी पाहिलं नाही. केलं तर नाहीच नाही. खरं सांगायचं तर सगळी लहान मुलं नकळत्या वयात, किशोरवयात स्वाभाविक असणारा जो वेडेपणा, जो हूडपणा सहज करतात त्यातल्या कशाचाच अनुभव माझ्या वाट्याला आला नाही. ऐन पावसाळ्यात नदीला पूर येत असे; पण मी कधी त्या पुरात सापडलो नव्हतो. उंच झाडावरून खाली पडलो नव्हतो. शाळेत म्हणा, गल्लीबोळांत म्हणा, कोणाशी भांडण किंवा मारामारी केली नव्हती. लहान मुलं हातपाय मोडून घेतात तसली दंगामस्ती केली नव्हती. 'काय वांड पोरगं आहे' असं माझ्याबद्दल कोणी म्हटल्याचं मला आठवत नाही. शेजारच्या लोहारांची मुलं टेचात बिडी ओढत असत, ते मी नेहमी बघत होतो; पण मी एकदाही बिडी ओढून पाहिली नाही. लोक लहानपणी मित्र जोडतात, पुढे आयुष्यभर ती मैत्री जपतात असं खूप काही ऐकलं आहे; पण माझ्या बाबतीत हे घडलंच नाही. गावातल्या मायाळू लोकांशी पुष्कळ ओळख आहे; पण तिला मैत्री कसं म्हणता येईल?

गावातल्या निसर्गापासून, नैसर्गिक वातावरणापासून मी इतका अलिप्त कसा होतो, निसर्गाबद्दल एवढा अजाण कसा काय होतो ते माझं मलाच कळत नाही. पशू-पक्षी, झाडं, पानं-फुलं, फळं यांचं जगात जणू अस्तित्वच नसावं अशा वातावरणात मी वाढलो. त्या सर्व बाबतींतलं माझं अज्ञान मला आजही बोचतं, सलतं. आमच्या घरी कोणी कधी फुलं आणली नव्हती. थोरल्या बहिणीच्या लग्नाच्या वेळी मांडव घातला होता; पण तो फुलाबिलांनी सजवला नव्हता. भारतातून आलेले लोक भेटायला येतात. अमेरिकेतलं समृद्ध निसर्गवैविध्य पाहून एखाद्या वृक्षाची, फुलाची माहिती विचारतात; त्यावेळी मला उडवाउडवीची उत्तरं द्यावी लागतात. असंच एकदा एका मित्राने, 'अमेरिकेत पक्ष्यांचा किलबिलाट ऐकू येत नाही' हे लक्षात आणून

दिलं तेव्हा कुठे मला त्याची जाणीव झाली. स्वदेशात असताना तरी मी तो कुठे ऐकला होता? मग इथे त्याचा अभाव कुठला जाणवायला?

## बापूजींचं वेड

लहानपणीची एक गोष्ट मात्र पक्की लक्षात आहे, ती म्हणजे बापूजींच्या वेडाची! वडिलांच्या थोरल्या भावाला आम्ही बापूजी म्हणत असू. त्यांचं एकदा डोकं फिरलं होतं. त्यांचा मोठा मुलगा मुंबईला जाऊन खूप पैसे कमावू लागला होता. सायनला त्यानं मोठा फ्लॅट, गाडी घेतली होती. घरात कामाला गडी, स्वयंपाक करायला आचारी असा थाट होता. बापूजींच्या कुटुंबातल्या सगळ्यांनाच त्यानं मुंबईला बोलावून घेतलं. दूरच्या एका उपनगरात एक छोटीशी खोली घेऊन दिली. त्या एवढ्याशा खोलीत सातजणांचं कुटुंब दाटीवाटीनं राहत होतं. मुलानं आपल्याच ऑफिसात बापूजींना नोकरी लावून दिली. गावच्या निवांत, आरामशीर जीवनाची सवय असलेल्या बापूजींना मुंबईचं ते धकाधकीचं जीवन फारच कठीण वाटू लागलं. पहाटे लवकर उठा, उभ्या उभ्या चहा पिऊन होतो न होतो तोच गाडी पकडायला धावा, लांब तिकडे फोर्ट भागात जा आणि दुपारी डब्यातलं जेवण जेवा! आपल्याच मुलाच्या कचेरीत कारकुनाची नोकरी करायची. इतर नोकरांसोबत धावपळ करायची. उतारवयात हे सगळं त्यांना अगदी नकोसं झालं. त्याहीपेक्षा सर्वांत जास्त खुपत होता मुलाचा मिजासखोर स्वभाव! हा सर्व त्रास त्यांनी वर्षभर कसाबसा मुकाट्यानं सहन केला; पण एके दिवशी मात्र आपल्याच मुलाचं गैरवर्तन त्यांना सहन झालं नाही. त्यांचं पित्त खवळलं. राग अनावर झाला. सर्वांसमोर मुलाला झोडपून काढलं. ऑफिसात एकच खळबळ उडाली. बाप-लेकाची झटापट पाहून ऑफिसातल्या लोकांना धक्काच बसला. मग कोणीतरी मध्ये पडून मुलाला सोडवलं.

अचानक घडलेल्या या प्रसंगाने बापूजींची मनःस्थिती फारच बिघडली. आप्तेष्टांनी मध्यस्थी करून बापूजींना कुटुंबासह परत गावी पाठवून दिलं; पण बापूजींच्या मनाचा तोल ढळतच गेला. वेडच लागलं म्हणा ना! वैद्य झाले, डॉक्टर झाले; कोणाचेच इलाज लागू पडेनात. गावातले म्हातारे लोक म्हणू लागले– 'ह्याला देवीची बाधा झाली, देवी अंगात येते आहे. आता फक्त एकच इलाज आहे. ह्याला कनकेश्वरी देवीच्या मंदिरात घेऊन जा.' ते मंदिर होतं गीरच्या जंगलात. गावातल्याच एका बस कंपनीची

लहानशी बस भाड्याने घेतली आणि सगळं कुटुंब निघालं देवीच्या दर्शनाला गीरच्या जंगलात. त्यात बा, काका आणि दुसरी काही वडीलमाणसं. सोबत थोडी लहान मुलंसुद्धा होती. मुलांना कशासाठी नेलं होतं ते मला आजतागायत समजलेलं नाही. पोरांमध्ये कसा कोण जाणे; पण माझाही नंबर लागला होता. बसच्या त्या लांबवरच्या प्रवासात बापूजींचं वेड वाढतच गेलं. ते तोंडाला येईल तसं बरळत असत. शिव्यांचा भडिमार चाले. तेवढ्यावर थांबेना. आदळआपट, वस्तूंची तोडफोड करणं इथपर्यंत मजल गेली. अखेर नाईलाजानं त्यांना बांधून ठेवावं लागलं. हे सगळं चालत्या बसमध्ये. त्यातच वाटेत नदी लागली. होती उथळ; पण तरी आमची बस नदीत रुतली. ड्रायव्हरने आणि बाकीच्या मोठ्या माणसांनी खूप प्रयत्न केले; पण चिखलात रुतलेली बस काही निघेना. आता काय करायचं?

आम्ही सगळे नदीपात्रात उतरलो. कोणालातरी सोबत घेऊन काका शेजारच्या गावात मदत मागायला पायी निघाले. आम्ही सगळ्यांनी रेतीतच रात्र काढली. गीरमधून वाहणाऱ्या त्या नदीत ना वाघ आला ना सिंह; ना दुसरं कुठलं जनावर. एखादी डरकाळीही ऐकू आली नाही. मध्यरात्रीच्या शांततेत बापूजींच्या शिव्यांच्या डरकाळ्या तेवढ्या ऐकू आल्या. एखाद्या मोठ्या वयाच्या माणसाला असं शिव्या देताना मी प्रथमच पाहिलं. दुपार होईपर्यंत काका शेजारच्या गावातून एका मेकॅनिकला घेऊन आले. बस चिखलातून बाहेर निघाली. आम्ही सगळ्यांनी कनकेश्वरी मातेचा जयजयकार केला. मंदिरात पोहोचल्यावर देवीचं दर्शन, पूजा वगैरे आटोपून आम्ही परत आलो. त्यानंतर जवळपास सहा महिन्यांनी बापूजी बरे झाले.

अमेरिकेला आल्यानंतरच्या एका भारतभेटीत मी कुटुंबातल्या सगळ्यांना घेऊन कनकेश्वरीच्या दर्शनाला गेलो होतो. माझा नवविवाहित मुलगा आणि नवी सून ह्यांच्या हातून कनकेश्वरी मातेची सेवा घडावी अशी 'बा'ची इच्छा होती. गीरला जायला एक व्हॅन भाड्याने घेतली. आम्ही सगळे सहकुटुंब देवीच्या मंदिरात पोहोचलो. एक रात्र तिथेच राहिलो. परतीच्या प्रवासात वाटेत नदी लागली. त्या वेळी पंचवीस वर्षांपूर्वीचा माझा गीरचा पहिलावहिला प्रवास, बापूजींचं वेड, रेतीत काढलेली रात्र हे सारं काही आठवलं. तेवढ्यात एकाएकी आमची व्हॅन थांबली. मनात म्हटलं, 'आता हे काय झालं!' पुन्हा नदीत अडकणार की काय! पाहतो तर काय? सिंहाचं एक कुटुंब चक्क

रस्त्यात आडवं पहुडलं होतं. बा म्हणे, 'शुभशकुन झाला म्हणायचा!' सिंह पाहून मुलं फार खूश झाली. अमेरिकन सवयीप्रमाणे त्यांनी पटापट फोटो काढले. 'हॉर्न वाजवला तर ते उठून जातील' असं ड्रायव्हरने सुचवलं; पण आम्हाला फारशी घाई नव्हती अन् सिंहाच्या कुटुंबाला तर मुळीच नव्हती. आमच्या कुटुंबाचा आणि सिंहाच्या कुटुंबाचा 'स्टॅण्ड ऑफ' पंधरा मिनिटे चालला. अखेरीस सिंह उठला आणि धीमी पावलं टाकत निघून गेला. (कदाचित ती सिंहीण असेल.) पाठोपाठ सगळं कुटुंब. आमची व्हॅन पुढे निघाली.

**आमचं घर**

आमच्या घराचं दार अंगणात उघडत असे. माझ्या दोन्ही मोठ्या बहिणींच्या लग्नात तिथे मांडव घातला होता. अंगणाच्या उजवीकडे लहानशी माडी होती. तोच माझा आसरा होता. रात्रंदिवस माझा तिथेच मुक्काम असे. तिथेच बसल्याबसल्या मी गुजराती कादंबऱ्यांच्या विश्वात हरवून जात असे. बानं हाक मारली, की केवळ जेवणा-खाण्यापुरता खाली जात असे. डावीकडे छोटंसं स्वयंपाकघर; ते इतकं छोटं होतं, की जेवणासाठी आम्हाला आळीपाळीने जावं लागे. आणखी चार लहान लहान खोल्या. एक बा आणि काकांची, दुसरी मा आणि बापा म्हणजे आजी-आजोबांची. समोरच्या दोन खोल्यांत दूरचे मामा-मामी आणि आणखी एक विधवा मामी. खोल्यांच्या पुढ्यात ओसरी. आम्ही सगळी मुलं तिथे निजत असू. बा-काकांच्या खोलीत चार पावलं चालण्याइतकीसुद्धा मोकळी जागा नव्हती. तिथेच एक झोपाळा, त्याच्यामागे कपाट आणि एक पेटारा. त्या पेटाऱ्यामध्ये हिवाळ्यात लागणाऱ्या गोधड्या, रजया ठेवलेल्या असत. त्याखाली चांदीची भांडी आणि बाचे थोडेफार दागिने असावेत असं वाटतं. मात्र, बानं दागिने घातलेले मी कधी पाहिले नाहीत.

घराच्या सर्व भिंती कळकट आणि पूर्णपणे मोकळ्या. ना कुटुंबातल्या कोणाचे फोटो, ना देवादिकांच्या, कुलदेवतेच्या तसबिरी! गांधीजींच्या प्रभावामुळे काका तुरुंगात जाऊन आले होते; पण गांधीजींचा एखादा फोटो अथवा त्यांचं चित्र असं काही घरात शोधूनसुद्धा सापडलं नसतं. मी जोवर गावी होतो तोवर तरी घरातल्या भिंतींना चुना लावलेला पाहिला नाही. दाराबाहेर चित्रंबित्रं रंगवणं तर दूरच! अंगणात कधी रांगोळी काढलेली आठवत नाही.

नाही म्हणायला बा-काकांच्या खोलीत पूजेचा एक कोनाडा होता. त्यात कोणाची मूर्ती होती ते आत्ता आठवत नाही; पण सणावारी बा तिथे दिवा लावत असे.

छपरावरची कौलं देशी होती, विलायती नव्हती. मुसळधार पाऊस पडला तर दोन खोल्यांमध्ये पाणी गळू लागे. त्या जागी बादल्या ठेवाव्या लागत. फर्निचर म्हणावं असं घरात काही नव्हतंच. एक खाट होती; पण त्यात असंख्य ढेकूण. साहजिकच कोणी त्या खाटेवर निजत नसे. जमिनीवर गाद्या घालून झोपणंच बरं वाटे. अंघोळीला (नदीवर गेलो नसू तर...) किंवा जेवायला बसण्यासाठी एक पाट होता. एकटे बापाच तो वापरत. दिवाणखान्यात आणि डायनिंग रूमचं म्हणून काही फर्निचर असतं हे फक्त हॉलीवूडच्या सिनेमांत पाहिलं होतं तेवढंच! मुंबईला गेल्यावरदेखील तसं फर्निचर घेऊ शकलो नव्हतो. मुंबईतल्या एका श्रीमंत नातेवाइकाकडे पहिल्यांदाच सोफ्यावर बसलो तेव्हा अगदी शहारून गेलो होतो. ज्या गल्लीत राहत होतो त्या गल्लीला नाव, घराला नंबर काही नव्हतं. घरांना, गल्ल्यांना नावं द्यायची पद्धतच नव्हती. तशी गरजही कधी भासली नाही. चुकून कधी टपाल आलंच तर कोण कुठे राहतं ते सगळ्यांना माहीत असायचं. सतरा वर्षांच्या माझ्या गावातल्या वास्तव्याच्या काळामध्ये आमच्या घरी टपाल आलेलं मला तरी स्मरत नाही. त्या चिंचोळ्या गल्लीत अगदी आमच्या घरासमोर लोहाराचं एक कुटुंब राहायचं. घरात खूप माणसं होती. शेजारीच त्यांचं दुकान. तिथे वजनाचे काटे बनवत. आमच्या गावातला सर्वांत मोठा धंदा म्हणजे वजनाचे काटे बनवण्याचा! गाव त्यासाठी प्रसिद्ध होतं. लोहाराच्या धगधगत्या भट्टीसमोर बसून आम्ही मुलं वजनकाटा कसा बनवतात ते बघत असू. लोहाराची दोन मुलं समोरासमोर गुडघ्यावर अर्धवट उभी राहून, भट्टीतून काढलेल्या, तापून लालबुंद झालेल्या लोखंडी पट्ट्यावर घणानं घाव घालत असत. त्यांतून ठिणग्या उडत. त्या उडत्या ठिणग्यांनी मी भाजला गेलो नाही हे आश्चर्यच म्हणायचं. त्या ठिणग्यांमुळे लोहाराच्या एका मुलाने तर दोन्ही डोळे गमावले होते. तरीसुद्धा शाळेतून आल्यावर मी रोज त्या भट्टीपुढेच बसत असे. लोहार आपलं काम करत राहत असत. बाजूने माणसांची ये-जा सुरू असे. तिथे अमेरिकेतल्यासारखे 'Occupational Safety and Health administration'चे इन्स्पेक्टर येणार होते थोडेच!

◆

## पुस्तकाच्या पानांतून




# द गोल्डन एज

**जोन लंडन** अनुवाद **: विजय परांजपे**

*फ्रँक आणि एल्सा आहेत पोलिओग्रस्त...*
*पण मनाला त्यांच्या लागलेत पंख*

### १. प्रकाश

दुपारी विश्रांती घेण्याची वेळ होती. तो नवीन मुलगा– फ्रँक गोल्ड– स्वतःच्या पलंगावरून उतरून चाकांच्या खुर्चीत बसला आणि अगदी सावकाशपणे ती गाडी हातांनी चालवत त्या व्हरांड्यातून निघाला. तिथे आसपास कोणीच

नव्हतं. डिसेंबर महिन्यातले ते दिवस होते आणि वातावरणात चांगलाच उष्मा जाणवू लागला होता. आता तो रुग्णालयात चांगलाच रुळला होता. त्यामुळे त्याला चांगलंच ठाऊक होतं की, वरच्या मजल्यावरच्या परिचारिका पंखे लावून शांतपणे झोपल्या असतील. मुख्य परिचारिका पेनीच्या कार्यालयाचं दार बंद होतं, म्हणजे ती नक्कीच तिच्या कोचावर ढाराढूर झोपलेली असणार.

नेहमीप्रमाणे सगळ्यात आधी त्याला एल्साला डोळे भरून पाहायचं होतं. मुलींच्या विभागाच्या अर्धवट उघड्या असलेल्या दाराच्या बिजागरीच्या फटीतून त्याने चोरून पाहिलं. एल्साचा पलंग दाराच्या मागेच होता. ती शांतपणे निजलेली असताना तिचा चेहरा न्याहाळणं त्याला फार आवडत असे. कधीतरी तिचा चेहरा वळून उशीत लपला असला, तरीही नजरेस पडणाऱ्या तिच्या दाट, सोनेरी, तपकिरी केसांमुळे त्याच्या मनात आशा जिवंत राहत असे; पण आज मात्र तिचा पलंग रिकामा होता.

तो शांतता असलेल्या स्वयंपाकघराच्या मागे गेला. अगदी माश्याही झोपल्या होत्या. जणूकाही ती सगळी जागा मंत्राने भारल्यासारखी झाली होती; फक्त तो निसटला होता.

तो जणू याच क्षणाची वाट पाहत होता. त्याच्या खिशात सिगारेट आणि काडेपेटी होती. मागच्या खेपेला त्याची आई त्याला भेटायला आलेली असताना सिस्टर पेनीला भेटायला गेली होती. जाताना तिने स्वत:ची पर्स त्याच्या पलंगावर ठेवली आणि ती संधी साधून त्याने तिच्या पर्समधून ती सिगारेट आणि काडेपेटी चोरली होती. नंतर त्याच्या मन:चक्षूंसमोर आईची प्रतिमा उभी राहिली. त्या संधिप्रकाशात रेल्वे प्लॅटफॉर्मवर उभी असताना तिला सिगारेट ओढण्याची अनावर तल्लफ आली. म्हणून पर्समध्ये हात घालून ती सिगारेट आणि काडेपेटी शोधू लागली. या भेटींमुळे येणारं मनाचं अस्वस्थपण नकोसं होत असल्याने इडा प्रत्येक आठवड्याला भेटीस येत नसे.

पण, ती सिगारेट हातात असल्यामुळे आपल्या हातून निसटलेलं असं स्वतःचं काहीतरी महत्त्वाचं पुन्हा मिळवल्यासारखं त्याला वाटत होतं. त्याच्यातला तो चोरटेपणा पुन्हा डोकं वर काढू लागला होता. त्याला अचानक मोकळेपणा वाटू लागला. स्वत:च्या आयुष्यावर पुन्हा एकदा ताबा

मिळाल्यासारखं त्याला वाटलं. वागण्यातला चोरटेपणा हादेखील एक प्रकारचा खासगीपणाच होता आणि इथे आल्यावर सर्वांत प्रथम तोच नष्ट झाला. त्या जागेतला बालिशपणा, तिथली लहानशी स्वच्छतागृहं, तिथल्या झोपेच्या वेळा, तिथले नियम, त्या जागेचं काहीसं रुग्णालयासारखं तर काहीसं शिशुशाळेसारखं असणं... या सगळ्यालाच त्याचा विरोध होता. त्याला जेव्हा इथे पाठवलं गेलं, त्यावेळी त्याच्या मनात आपल्याला क्षुल्लक व्यक्ती असल्यासारखी वागणूक मिळत आहे, अशी भावना निर्माण झाली होती आणि ती भावनाच त्याला नको होती.

रुग्णवाहिकेतून तो इथे येऊन पोहोचला, तेव्हा सिस्टर पेनीने त्याचं स्वागत करताना म्हटलं होतं, ''तू इथे आल्यामुळे आम्हाला फारच आनंद झाला. तुम्हा मोठ्या मुलांचा आदर्श लहान मुलांसमोर नेहमीच असतो.''

फ्रँकने तिच्या तेजस्वी चेहऱ्याकडे शोधक नजरेने पाहिलं. त्याला लगेच कळलं, की तिथे शोधण्यासारखं काहीच नव्हतं. सगळा गुंता कधीच सोडवून झालेला दिसत होता.

लुळेपांगळे, लहानसे प्राणी असलेल्या बेटावर उतरणाऱ्या चाच्यासारखे त्याला वाटले. एका प्रचंड लाटेने त्यांना या बेटावर भिरकावून दिलं होतं. तिथे जखडून ठेवलेल्या त्याच्यासारख्या सगळ्यांनाच घरी जायचं होतं.

तिथून पुढे तो उतारावरून घसरत खाली गेला. त्या उतारावर चांगलं छप्पर बांधलं होतं. उतारावरून जाताना वाटेत त्याला न्यू ट्रीटमेन्ट ब्लॉक लागला. तोच रस्ता पुढे कपडे वाळत घालण्याच्या जागेपर्यंत जात होता. ही जागा वेलींना आधार देण्यासाठी तयार केलेल्या तारेच्या जाळ्यामागे होती. इथेच लपल्यावर तो कोणालाही दिसणं शक्य नव्हतं. जेवणाच्या वेळेपर्यंत वाळून कडक झालेले कपडे आवरलेले होते. रस्त्यापलीकडे असलेल्या जाळी तयार करण्याच्या कारखान्यातील धडधड आणि खडखड इथपर्यंत चांगली जोरात ऐकू येत होती. एखाद्या प्रचंड प्राण्याला बंदिवान केलेल्या पिंजऱ्याच्या आसपास जावं, तसं तिथे वाटत होतं. एरवी आसमंतातल्या पांढऱ्याशुभ्र प्रकाशानेही त्याला बरं वाटत असे; परंतु पोलिओमुळे आलेला ताप उतरल्यापासून त्याला प्रकाशही अंधूक, निस्तेज आणि विषण्ण वाटत असे.

असे एकांताचे क्षण त्याच्या वाट्याला क्वचितच येत असत आणि ते क्षण भरभरून जगण्याचा तो प्रयत्न करत असे. त्याने सिगारेट तोंडात

ठेवली आणि त्या तकलादू काड्या एकामागोमाग एक उजळण्याचा तो प्रयत्न करू लागला. कपाळावरून ओघळणारा घाम त्याच्या डोळ्यांत जाऊ लागला आणि हात थरथरू लागले. इडाच्या नावे शापवाणी उच्चारावी, असं त्याला उगाचच वाटून गेलं.

कुठल्यातरी माणसाच्या सावलीने त्याच्यावर येणारा प्रकाश अडला. दोन प्रचंड पंज्यांच्या ओंजळीत पेटलेली ज्योत त्याला दिसली. नॉर्म व्हाइटहाउसची गुरगुर त्याच्या कानांवर पडली, ''सिगारेट पेटवायची आहे का?'' दीर्घ श्वास घेत फ्रँकने मान वळवली. त्याचं हृदय प्रेमाने उचंबळून आलं. तिकडचं माळीकाम करणारा नॉर्म सगळ्यांना इतका प्रिय का होता, ते आता त्याला कळलं. अगदी सावकाश चालत तो तिथून निघून गेला. जणू त्याला म्हणायचं असावं की, शांतपणे सिगारेट ओढण्याचा अधिकार प्रत्येक माणसाला आहे.

पुढच्याच क्षणाला त्याने सिगारेट कपडे वाळत घालण्याच्या जागेतील खांबावर चुरगळून कुंपणाबाहेर फेकून दिली. आपण बहुतेक आजारी पडू, असं फ्रँकला वाटलं. त्याला भोवळ आल्यासारखं वाटत होतं. डोळ्यांसमोर अंधार पसरला होता. अंधाऱ्या व्हरांड्यातून तो कसाबसा आपल्या पलंगापर्यंत पोहोचला आणि त्याने स्वतःला पलंगावर झोकून दिलं. त्याचं शरीर आता सर्वसामान्य मुलासारखं राहिलं नव्हतं.

तो आता त्याच्या अवतीभोवती झोपलेल्या, सर्वांगाला साबणाचा वास येणाऱ्या बालकांसारखा अगदी लहान मूलही राहिला नव्हता. थोड्या वेळाने हृदयाची धडधड कमी झाल्यावर त्याच्या चेहऱ्यावर हास्य पसरलं. नॉर्मचा गुरगुरल्यासारखा आवाज त्याच्या कानांत अजूनही रुंजी घालत होता.

''सिगारेट पेटवायची आहे का?''

त्याने कदाचित काही वेगळंच विचारलं असेल;

पण या सगळ्यात एल्सा कुठे होती?

**२. द गोल्डन एज**

फ्रँक गोल्ड आता जवळजवळ तेरा वर्षांचा झाला असला, तरी त्याच्या वयाच्या मानाने त्याची योग्य प्रकारे वाढ झालेली नसल्याने, त्याला गोल्डन एजमध्ये दाखल केलं होतं. IDB (Infectious Diseases Branch of the Royal Perth Hospital) मध्ये एकमताने हे मान्य झालं होतं, की

त्याने प्रौढ रुग्णांच्या सोबतीने राहणं योग्य नाही. ते सगळं कुटुंबच ऑस्ट्रेलियामध्ये नव्यानेच राहायला आलं होतं. त्याचे दोन्ही पालक नोकरी करत असल्यामुळे आणि त्यांच्या कुटुंबात आणखी कोणीच नसल्यामुळे फ्रँकची काळजी कोण घेणार, हा प्रश्न होता. त्याला 'गोल्डन एज' मधील आनंददायी वातावरणाची, देखरेखीची गरज होती. त्याचबरोबर त्याचा शालेय गृहपाठ कोणीतरी करून घ्यायला हवा होता. त्यामुळे ताबडतोब ॲम्ब्युलन्सची व्यवस्था करून त्याला त्याच दुपारी तिथे दाखल करण्यात आलं.

एल्सा ब्रिग्स साडेबारा वर्षांची होती; पण तिच्या आईला अजून एक लहान मूल असल्यामुळे, तिला एल्साकडे पुरेसं लक्ष देणं जमत नसे. इतर रुग्ण राज्याच्या विविध भागांतील रहिवासी होते. वाळवंटी प्रदेशातील विलुना, समुद्रकिनारी भागातील ब्रुमे, ट्रान्स-ऑस्ट्रेलियन रेल्वेजवळ असलेल्या रॉलिनाहून आलेले रुग्ण त्यामानाने लहान होते. तुम्ही कितीही दूर वसलेल्या शहरात जाऊन राहिलात, तरीही पोलिओचा विषाणू तिथे पोहोचल्याशिवाय राहणार नाही, असं दिसत होतं.

लीडरविल रेल्वेस्थानकापासून चालत पाच मिनिटांच्या अंतरावर असलेलं 'गोल्डन एज' शतकाच्या शेवटी एक पब म्हणून बांधलं होतं. शहराच्या मध्यापासून जेमतेम दोन टप्प्यांवर ते होते. चारही बाजूंनी रस्त्यांनी वेढलेलं असल्यामुळे एखाद्या बेटाप्रमाणे अलिप्त असं हे ठिकाण वाटत असे. त्याच्या सध्याच्या स्वरूपात त्याला नैसर्गिकरीत्या एकांत मिळाला होता. त्यातील तीन रस्त्यांवर उपनगरातील घरांप्रमाणे टुमदार पण साधी घरं होती. ज्यांच्या मागील बाजूस प्रशस्त बाग, पुढे सुंदर पोर्च आणि पडद्यांनी झाकलेल्या काचेच्या खिडक्या होत्या. चौथ्या रस्त्यावर असलेली 'डब्ल्यू. ए. वायर नेटिंग फॅक्टरी' चोवीस तास धडधडत असे. काहींच्या मते, हे ठिकाण रुग्णालयासाठी योग्य नव्हतं; पण तिथे होणारा आवाज आणि रात्रभर खिडकीतून येणारा दिव्यांचा प्रकाश मुलांना मात्र आवडत असे.

१९४९मध्ये आरोग्य खात्याने हा पब विकत घेऊन त्याचं रूपांतर पोलिओग्रस्त मुलांसाठी 'द गोल्डन एज चिल्ड्रेन्स पोलिओ कॉन्व्हॅलेसन्ट होम'मध्ये केलं. वर्षानुवर्षं तिथे येणाऱ्या पोलिओच्या साथीमुळे अपंग झालेल्या मुलांची सेवा तिथे केली जात असे. ज्यांची काळजी घरी घेणं शक्य नाही, अशा देशभरातून आलेल्या चौदा मुलांसाठी योग्य अशी व्यवस्था तिथे केली

जात असे. तिथे अपंगांना चालण्यासाठी योग्य असे उतार, हाताने धरता येतील अशा दांड्या आणि चालण्यासाठी योग्य मार्ग होते. प्रशिक्षित परिचारिका, शालेय शिक्षक आणि पूर्ण वेळ फिजिओथेरपिस्ट असल्यामुळे ते एक अत्याधुनिक उपचार केंद्रही होतं.

बाहेर असलेल्या धुळीच्या आणि वृक्षविहीन रुक्ष रस्त्यांमुळे ही वास्तू अजूनही पबसारखीच वाटे. विटांनी बांधलेल्या या दोनमजली इमारतीच्या रुंद बाल्कनीचं आच्छादन खालील व्हरांड्यास मिळत असे. थंडाव्यासाठी रुंद भिंती व त्यातील कमान असलेल्या उंच खिडक्या होत्या. वरचं अर्धगोलाकार पत्र्याचं छप्पर खाली ओढलेल्या टोपीसारखं वाटत असे. आतील रुंद, परंतु अंधाऱ्या बोळातून व्हीलचेअर सहजपणे इथून तिथे जाऊ शकत असत. तेथील जमिनीवर जुन्या, पॉलिश केलेल्या निलगिरीच्या लाकडाच्या लांब-रुंद फळ्या बसवलेल्या होत्या. इमारतीचा बाह्यरूपी दिसणारा अत्यंत साधेपणा आणि आपलेपणा यांच्यावरून त्या वास्तूचे 'योग्य काळजी घेणे आणि घरगुती वातावरण पुरवणे' हे हेतू दर्शविले जात होते.

मूळ नाव तसंच ठेवणं केवळ अप्रस्तुतच नव्हे, तर कमालीचं उपरोधिक म्हणता येईल असं होतं. कोणाचीच अशी इच्छा नसते, की एखादं मूल अशा प्रकारे अपंग व्हावं; परंतु त्या जागेचा मूळ उपयोग, सुंदर हवा यांच्यामुळे तेथील वातावरण आनंदी असे. तेथील वातावरण छान होतं. तिथे असलेली मुलं आजारी नसत; पण त्यांना बाहेरच्या जगात जाण्यासाठी मदतीची गरज असे.

कर्मचारी आणि पालक 'गोल्डन एज'बद्दल समाधानी होते. तेथील खोल्या प्रशस्त आणि थंडगार होत्या आणि खोल्यांच्या छतांची उंची भरपूर होती. मुलांच्या चेहऱ्यावर आनंद, समाधान आणि आशावाद होता. इडा गोल्डला तेथील कर्मचारी 'राजकुमारी' म्हणून प्रेमाने संबोधित असत. कुठेही कोणतीही कमतरता दिसली, तर इडा ताबडतोब निदर्शनास आणून देत असे; मात्र तिनेही तिथल्या सुंदर व्यवस्थेबद्दल स्वतःच्या मनातील कृतज्ञता मोकळेपणाने व्यक्त केली होती.

प्रेमाने घेतल्या जाणाऱ्या काळजीमुळे तिथे राहणारी मुले आनंदात असत. ती मुलं इथे राहत असल्यामुळे पालकांना त्यांच्या मुलांची काळजी करावी लागत नसे. गोल्डन एजमध्ये काही मुलं फक्त शालेय शिक्षण

आणि विशेष उपचारांसाठी येत असत; परंतु तिथे कायमस्वरूपी राहणाऱ्या मुलांना तेथील सगळ्या व्यक्ती आपल्या कुटुंबातील असल्याप्रमाणेच वाटत असत. उपचार आणि शिक्षणासाठी तिथे भरती झाल्या दिवसापासून त्या मुलांना अगदी एका कुटुंबात असल्याप्रमाणे विशेष वेगळेपणा जाणवे. सकाळपासूनच वर्गात आणि नवीन उपचार केंद्रात मुलांची वर्दळ असे.

फ्रँक इथे नवखा होता आणि स्वत:चं अस्तित्व शोधत होता. आपण इतर मुलांप्रमाणे सर्वसामान्य व्हावं, यासाठी तो आतुर होता. पाय जमिनीवर रोवून चालण्याचा प्रयत्न करत होता. संस्थेकडून त्याची पुन्हा एकदा पाठवणी होऊ नये म्हणून चांगलं वागण्याचा त्याने निश्चय केला.

एखाद्या शांत रात्री तो पलंगावर पहुडला असता आणि काही वेळा दिवसादेखील लीडरविल स्थानकात येणाऱ्या आणि तिथून बाहेर जाणाऱ्या आगगाड्यांचे भोंगे ऐकले की त्याला मानसिक आधार मिळत असे.

आणि सगळ्यात महत्त्वाचं म्हणजे त्याला एल्सापासून दूर जायचं नव्हतं.

त्याच्या डोक्यात एक ओळ आली. त्या ओळीने सुरुवात करून कदाचित एक कविता होऊ शकली असती.

मी तुला शोधत असताना,<br>
आज तुझा पलंग मोकळाच होता,<br>
का बरं?

पोलिओने त्याला पांगळं केलं आणि त्याच्यातल्या कवीने जन्म घेतला.

**३. एल्सा**

एल्सा लहान मुलांच्या खोलीत रायमा कॉलेजवळ बसली होती. दुपारच्या नि:शब्द वेळेस कोणाच्यातरी हळुवार हुंदक्यांचा आवाज व्हरांड्यातून एल्साला ऐकू आला. चाकांच्या खुर्चीवर बसून ती सरळ रायमाच्या पलंगाकडे निघाली.

रायमाकडे निरखून बघत तिने तिला ''रडू नकोस'' असं पलंगाच्या लोखंडी दांड्यांमधून पाहत कुजबुजत्या आवाजात सांगितलं. तिच्या आवाजात ठामपणा होता. लहान मुलांच्या बाबतीत एल्सा हळवी नव्हती. तिला नेहमीच एखाद्या लहान बहिणीची काळजी घ्यावी लागत असे. सर्वांत आधी

रायमाचं रडणं थांबवणं आवश्यक होतं. तिने स्वतःच्या तोंडात बोट घालून गाल शक्य तितके फुगवले आणि बोट झटक्यात तोंडातून बाहेर काढलं. तसं करताना गमतीशीर आवाज झाला. रायमा क्षणभर रडायची थांबली आणि परत हुंदके देऊ लागली. तिचा छोटासा सावळा चेहरा आसवांनी ओला झाला होता आणि डोळे सुजलेले होते.

लहान मुलांचं रडणं थांबवायचं, तर त्यांचं लक्ष एखाद्या वेगळ्याच गोष्टीकडे वेधून घ्यावं लागतं.

''चला!'' पलंगाच्या कडेला असलेला कठडा खाली करून तिने रायमाला जवळ ओढून घेतलं आणि रायमाच्या हाताला बांधलेली लाकडी पट्टी सोडवली. आधारासाठी पलंगावरील गादीवर वाकत तिने रायमाला जवळ ओढून आपल्या मांडीवर घेतलं. त्या छोट्याशा जिवाला उचक्या येत होत्या.

आपली हनुवटी रायमाच्या खांद्यावर ठेवत, तिला सांभाळत एल्सा खिडकीकडे गेली. खिडकीच्या पुढे असलेला मोठा पांढरा पडदा सरकवून तिच्या स्वत:च्या व्हीलचेअरभोवती गुंडाळला, जेणेकरून खोलीतल्या कोणालाही त्या दिसल्या नसत्या आणि त्यांना बाहेरचं दृश्य दिसलं असतं. व्हरांड्याच्या सावलीतून आता त्यांना बाहेरचं जग दिसत होतं. त्या दोघींच्या दृष्टीने त्या क्षणी जग म्हणजे फक्त रस्त्याचा एक लहानसा पट्टा आणि त्या रस्त्याच्या कडेने असलेली काही घरं, इतकेच होते. त्यांच्यासाठी जग म्हणजे हेच, इतकंच होतं.

''ते बघ,'' तिने वर बोट करत रायमाला म्हटलं. दुपार उलटू लागली होती. त्यावेळी साधारणपणे असणाऱ्या शुभ्र प्रकाशावर करड्या रंगाचं आच्छादन आलं होतं. एक विरळ ढग त्यांच्या नजरेसमोरून पुढे सरकला. समुद्रावरून जमिनीच्या दिशेने वाऱ्याची झुळूक येत असावी. रुग्णालयातील कंटाळवाण्या दिवसांत विलगीकरण कक्षातील उंच खिडकीतून दिसणारं आकाश हे एल्साला जणू अंगण वाटायचं, तिला स्वातंत्र्याचा, सिनेमा बघितल्याचा आनंद द्यायचं. आकाशाकडे बघताबघता ती आतून शांत होत असे. ढगांचे अनेक आकार आणि रंग जणू तिला काही संदेश देत तिच्याशी बोलत. मला जेव्हा मोकळेपणाने हिंडताफिरता येत होतं, स्वच्छ सूर्यप्रकाश अंगावर घेता येत होता, मोकळं वारं कानांत भरून घेता येत

होतं; तेव्हा आकाशातल्या या गमतीजमतींकडे मी दुर्लक्ष कसं काय केलं, याचं तिला नवल वाटत होतं.

रायमाच्या घाबरलेल्या डोळ्यांत बघत एल्सा तिला म्हणाली, ''तुझी आई आकाशाकडे बघत तुझी आठवण काढते.'' रायमा नक्कीच तिच्या आईच्या आठवणीनेच रडत होती. ते नित्याचंच होतं. एल्सादेखील त्या वेगळ्या खोलीत असताना नेहमी आपल्या आईच्या पावलांची चाहूल घेत असे, आपले जुने ऑर्थोपेडिक बूट घालून व्हरांड्यातून तिला शोधत घाईघाईने इथेतिथे फिरत असे, काचा लावलेल्या खिडक्यांच्या पलीकडून तिच्याकडे पाहत हात हलवत हसत असे; पण हे करताना अगदी प्रयत्नपूर्वक आपल्या मनातलं दुःख तिने कोणालाच जाणवू दिलं नाही.

तिच्या दृष्टीने आकाश इतकं महत्त्वपूर्ण झालं होतं, की तिच्या मनात आकाश आणि आई यांचं अस्तित्व एकमेकांमध्ये मिसळून गेलं होतं. आकाशाकडे बघताना तिला नेहमीच आईची आठवण येत असे. जणूकाही ते तिला सांगत असे, की काही भावना या आजन्म टिकून राहतात आणि त्या कधीच बदलत नाहीत. जर तिची आई तिला भेटायला आली नाही, तर तिला आकाशाकडे बघून नेहमी धीर मिळत असे. जणू ते तिला सांगत असे, की आयुष्यात मनुष्य नेहमीच एकटा असतो. तुमच्यावर कोणताही प्रसंग ओढवला तरी जग कोणासाठीच थांबत नाही.

शेवटी जेव्हा ती विलगीकरण कक्षातून बाहेर आली आणि तिच्या आई-वडिलांना तिच्याजवळ बसण्याची परवानगी मिळाली; पण आता ते तिला अगदीच लहानखुरे वाटू लागले. त्यांनी भयापोटी जे काही सोसलं होतं; त्याचा परिणाम होऊन ते अगदीच म्हातारे, आकसलेले आणि आजारी असल्यासारखे वाटत होते.

तिला काहीतरी झालं होतं; पण ते काय होतं, ते अद्याप तिला कळलं नव्हतं. जणूकाही ती दूर कुठेतरी जाऊन आली होती आणि तिथून आल्यावर तिच्यात आणि इतर सगळ्यांमध्ये अंतर निर्माण झालं होतं.

आता पाळी रायमाची होती. तिलादेखील आईशिवाय या परिस्थितीशी जुळवून घ्यायला आता शिकावं लागणार होतं. आई जवळ नसली, तरी विचार करावाच लागणार होता.

हे जणू आपल्या माणसाचा हात सोडून उंचावरून उडी मारणं, शाळेत

एकट्याने जाणं होतं. एकदा हे केल्यावर मनात दडलेली भीती चेपते आणि पुढे सगळंच सुरळीत होत जातं.

सगळीच मुलं आपल्या आईच्या पावलांचा आवाज ओळखतात आणि सगळ्यांनाच स्वतःची आई यायला हवी असे; पण फ्रँक गोल्डला मात्र आपले वडील यावेत, असं वाटत असे.

आता 'गोल्डन एज'मध्ये एल्साची आई तिला भेटून गेल्यानंतर तिच्या मनात एक गमतीशीर विचार येत असे की, आणखी एक आई तिला भेटण्यासाठी थांबून राहिली होती; पण तिचं स्वरूप अस्पष्ट, धुरकट, सौम्य, एखाद्या देवदूताप्रमाणे सुंदर होतं आणि त्या देवदूताप्रमाणे तिला सारंकाही समजणार होतं.

◆


**नवी संहिता... नवा आशय...**

धर्म...
कबीरांच्या मनातला

ओशो

अनुवाद

**प्रज्ञा ओक**




कबीरांच्या दोह्यांतील आध्यात्मिक अन्वय उलगडणारी ओशोंची चिंतनशील प्रवचने

**किंमत : २५०/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

**१६ एप्रिल ते १५ मे २०२५ दरम्यानचा दिनविशेष**

दिनविशेषानिमित्त पुस्तकसंचावर **५० टक्क्यांपर्यंत सूट**

**खालील संचांवर १६ ते ३० एप्रिल दरम्यान खास सवलत**

**१७ एप्रिल - शशिकांत वामन काळे यांचा जन्मदिन**
'मगरडोह' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत २००/- । सवलत किंमत १२९/-**

**१८ एप्रिल - मीरा सिरसमकर यांचा जन्मदिन**
'हसाल तर वाचाल', 'खुलदाबादचा खजिना', 'नोबेल ललना भाग-१', 'नोबेल ललना भाग-२' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत ५१०/- । सवलत किंमत २९९/-**

**१९ एप्रिल - पारू नाईक यांचा जन्मदिन**
'मी का नाही ?', 'मोहिनी' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत ३८०/- । सवलत किंमत १९९/-**

**१९ एप्रिल - जिन ली लेथम यांचा जन्मदिन**
'आगे बढो' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत २००/- । सवलत किंमत १२९/-**

**२० एप्रिल - अजय पांडे यांचा जन्मदिन**
'रेझोनान्स' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत ३९५/- । सवलत किंमत २४९/-**

**२० एप्रिल - सेबॅस्टिअन फॉक्स यांचा जन्मदिन**
'डेव्हिल मे केअर' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत २४०/- । सवलत किंमत १४९/-**

**२० एप्रिल - झियाउद्दीन युसफझाई यांचा जन्मदिन**
'लेट हर फ्लाय' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत १९५/- । सवलत किंमत १३९/-**

**२१ एप्रिल - ज्ञानदा नाईक यांचा जन्मदिन**
'तजेलदार कॅनव्हास', 'गोष्ट डॉट कॉम भाग १', 'गोष्ट डॉट कॉम भाग २',

‘गोष्ट डॉट कॉम भाग ३’, ‘छोटीशी पाऊलवाट’, ‘खरा गुरू कोण’, ‘राजा, कबुतर आणि वृद्ध’, ‘राजवाडा आणि वन’, ‘सोन्याचं कडं’ या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत २१३५/- । सवलत किंमत १६०१/-**

**२१ एप्रिल - ॲलिस्टर मॅक्लीन यांचा जन्मदिन**

ॲलिस्टर मॅक्लीन यांच्या १४ पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ४९९०/- । सवलत किंमत ३४९३/-**

**२१ एप्रिल - डॉ. सुवर्णा नाईक निंबाळकर यांचा जन्मदिन**

‘करवीर छत्रपती इंदुमती राणीसाहेब’, ‘ज्ञानाई सावित्रीबाई फुले’, ‘महाराणी बायजाबाई’, ‘महाराणी येसूबाई’, ‘शिवपत्नी महाराणी सईबाई’ या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत १५००/- । सवलत किंमत ११२५/-**

**२२ एप्रिल - चेतन भगत यांचा जन्मदिन**

‘फाइव्ह पॉइंट समवन’, ‘द थ्री मिस्टेक्स ऑफ माय लाईफ’, ‘वन नाईट@ द कॉल सेंटर’ या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ७२०/- । सवलत किंमत ४९९/-**

**२२ एप्रिल - डॉ. बाळ फोंडके यांचा जन्मदिन**

बाळ फोंडके यांच्या १७ पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ४२७५/- । सवलत किंमत ३२५२/-**

**२३ एप्रिल - यशोधरा काटकर यांचा जन्मदिन**

‘बंजाऱ्याचे घर’, ‘थर्ड पर्सन’, ‘अपूर्व, अलौकिक, एकमेव...’, ‘कमबख्त निंदर या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ९००/- । सवलत किंमत ६३०/-**

**२३ एप्रिल - जागतिक इंग्लिश भाषा दिन**

'EASY ENGLISH GRAMMAR AND COMPOSITION', 'A Methodical English Grammar', 'Fifty Essays' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ८५५/- । सवलत किंमत ५३१/-**

**२३ एप्रिल - जागतिक पुस्तक दिवस**
५००० च्या खरेदीवर ४०% सवलत. नेट ३००० ची खरेदी बंधनकारक. एका पुस्तकाची एक प्रत.
**सवलत एक दिवसाकरिता मर्यादित.**

---

**२३ एप्रिल - विल्यम शेक्सपिअर यांचा जन्मदिन**
विल्यम शेक्सपिअर यांच्या २२पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत १५००/- । सवलत किंमत १२७५/-**

---

**२४ एप्रिल - सचिन तेंडुलकर यांचा जन्मदिन**
'चेस युअर ड्रीम्स', 'प्लेइंग इट माय वे' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत ९९०/- । सवलत किंमत ६९३/-**

---

**२४ एप्रिल - कल्याणीरमण बेन्नूरवार यांचा जन्मदिन**
'अग्निदिव्य', 'तरंग' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत ७४५/- । सवलत किंमत ४७९/-**

---

**२४ एप्रिल - विला कॅथर यांचा जन्मदिन**
'देवाची माणसे' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत २८०/- । सवलत किंमत १९९/-**

---

**२८ एप्रिल - ए. जी. कृष्णमूर्ती यांचा जन्मदिन**
'धीरुभाईझम', 'असामान्य यशप्राप्तीसाठी दहा सामान्य सूत्रे', 'प्रतिकूलतेवर मात' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत ३५५/- । सवलत किंमत २१३/-**

---

**२९ एप्रिल - राजा रवि वर्मा यांचा जन्मदिन**
'राजा रवि वर्मा' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत ३४०/- । सवलत किंमत २१९/-**

---

**३० एप्रिल - अरुण शेवते यांचा जन्मदिन**
'चित्तचित्रे', 'मद्य नव्हे, हे मंतरलेले पाणी!', 'रंगल्या रात्री', 'रात्ररंग', 'साहेब संध्याकाळी भेटले...', 'स्वप्नी जे देखिले' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत ११८५/- । सवलत किंमत ६९९/-**

**३० एप्रिल - जॉन बायेन यांचा जन्मदिन**
'द बॉय इन द स्ट्राइप्ड पायजमाज्' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत १५०/- । सवलत किंमत ९९/-**

**खालील संचांवर १मे ते १५ मे दरम्यान खास सवलत**

**४ मे - रॉबिन कुक यांचा जन्मदिन**
रॉबिन कुक यांच्या १४ पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत ६३१५/- । सवलत किंमत ४१०५/-**

**४ मे - डॉ. एस. आर. देशपांडे यांचा जन्मदिन**
'भारतीय शिल्पवैभव', 'भारतीय गणिका', 'मराठेशाहीतील मनस्विनी' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत ५९०/- । सवलत किंमत ३२९/-**

**७ मे - रवींद्रनाथ टागोर यांचा जन्मदिन**
रवींद्रनाथ टागोर यांच्यावरील ६ पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत १०९०/- । सवलत किंमत ६७४/-**

**८ मे - ध्रुव भट्ट यांचा जन्मदिन**
ध्रुव भट्ट लिखित ७ पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत १८३०/- । सवलत किंमत १२०५/-**

**८ मे - द. ता. भोसले यांचा जन्मदिन**
'ग्रामीण बोलीचा शब्दकोश' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत २६०/- । सवलत किंमत १५६/-**

**११ मे - कल्पना कुलश्रेष्ठ यांचा जन्मदिन**
'इ.स.२५९५' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत २४०/- । सवलत किंमत १५९/-**

**१२ मे - मदर्स डे**
**संच १ :** 'चिकन सूप फॉर द मदर्स सोल भाग १,२,३', 'चिकन सूप फॉर द सोल : इंडियन मदर्स', 'आजीच्या पोतडीतल्या गोष्टी', 'करुणाष्टक'
**संचाची मूळ किंमत १२१५/- । सवलत किंमत ७९०/-**

**संच २ :** ‘रुचिरा भाग-१ व भाग-२’, ‘जिच्या हाती पाळण्याची दोरी’..., ‘गर्भसंस्कार’, ‘एक सांगू?’

**संचाची मूळ किंमत १४००/- । सवलत किंमत ९१०/-**

**संच ३ :** ‘सुखद मातृत्व’, ‘सुखद बालसंगोपन’, ‘माय डॉटर माय मदर’, ‘माझ्या लाडक्या लेकींसाठी’

**संचाची मूळ किंमत ८३०/- । सवलत किंमत ५४०/-**

**संच ४ :** ‘कळेल का ‘त्याला’ आईचं मन?’, ‘माझ्या अम्मीची गोष्ट’, ‘एका मातेचा लढा’, ‘कुंती’, ‘नॉट विदाउट माय डॉटर’, ‘द मदर’, ‘माऊली’ या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत २५४०/- । सवलत किंमत १६५१/-**

---

**१३ मे - डॅफने द्यू मोरियेर यांचा जन्मदिन**

‘जमेका इन’, ‘माय कझिन रेशेल’ या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ५५०/- । सवलत किंमत २९९/-**

---

**१४ मे - संभाजी महाराज जयंती**

‘संभाजी’, ‘छ. संभाजी : एक चिकित्सा’, ‘छत्रपती संभाजी स्मारक ग्रंथ’, ‘युवराज संभाजीराजे आणि सती गोदावरी’, ‘छावा’ (नाटक व कादंबरी), ‘छावा’ (इंग्लिश) या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ४२४४/- । सवलत किंमत ३१८३/-**

◆

**❖ किमतींमध्ये बदलाची शक्यता ❖**

**अधिक माहितीसाठी संपर्क :** फोन : ०२०-२४४७६९२४ / २४४७५४६२ / **Whats App No. ९४२०५९४६६५**

**website : www.mehtapublishinghouse.com**

**आपल्या लाडक्या लेखकांना शुभेच्छा !**

**या ईमेलवर पाठवा. author@mehtapublishinghouse.com**

TBC-35 Book No. 2


चार्ल्स ट्रम्पर या
यशस्वी आणि चतुर व्यावसायिकाची
रहस्यमय अंगाने उलगडत जाणारी
संघर्षमय जीवनगाथा




TBC-35 Book No. 3

आर्मस्ट्राँग आणि
टाउनसेंडचं एका वृत्तपत्राच्या
मालकीवरून जागतिक पातळीवर
रंगलेलं संघर्षनाट्य



लेखक
**जेफ्री आर्चर**

अनुवाद
**लीना सोहोनी**

ebook available

**RNI. No. MAHMAR/2000/02739**
Posting at BPC - Vishrambaug Wada, CSO, Pune - 411030.
Publication Date : 11/04/2025 Posting Date : 11/04/2025










## आवर्जून वाचावं









**मेहता मराठी ग्रंथजगत**
१९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड
टेलिफोन भवन समोर, पुणे-३०. फोन - (०२०) २४४७६९२४

प्रति, ______________________________